कृषीवल

पुरोगामी विचारांचा दीपस्तंभ

# जयंतभाई पाटील अभिष्टचिंतन विशेष

सरचिटणीस,
भारतीय शेतकरी कामगार पक्ष

दि. ७ जुलै २०२६

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
महाराष्ट्र

सत्यमेव जयते

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

जा.क्र/मु.मं.स/ज.क./५५७/२०२६
दि. ३० जून, २०२६

## शुभेच्छा

भाई जयंत पाटील यांना ७१ व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा! या निमित्ताने कृषीवलतर्फे त्यांच्या सार्वजनिक जीवनातील योगदानाचा गौरव करणारा विशेषांक प्रकाशित होत आहे, ही अत्यंत स्वागतार्ह बाब असून त्याबद्दल कृषीवलचे मनःपूर्वक अभिनंदन.

भाई जयंत पाटील यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात आपल्या अभ्यासपूर्ण, संयमी आणि लोकाभिमुख कार्यशैलीमुळे स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या वैचारिक परंपरेचा वारसा त्यांनी निष्ठेने पुढे नेला आहे. त्यांनी विधान परिषदेतील प्रदीर्घ कारकिर्दीत शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने प्रभावी भूमिका मांडली. संसदीय परंपरांचा आदर राखत अभ्यासपूर्ण आणि मुद्देसूद मांडणी करण्याची त्यांची शैली नव्या लोकप्रतिनिधींसाठी प्रेरणादायी ठरली आहे.

भाई जयंत पाटील यांचे सार्वजनिक जीवनातील योगदान महत्त्वपूर्ण असून हा विशेषांक त्यांच्या कार्याचा समर्पक आढावा घेणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त करतो. वाढदिवसानिमित्त त्यांना उत्तम आरोग्य, निरामय दीर्घायुष्य आणि अखंड लोकसेवेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

(देवेंद्र फडणवीस)

दूरध्वनी : ०२२-२२०२ ५१५१/२२०२ ५२२२, ई-मेल : cm@maharashtra.gov.in
वेब साईट : www.maharashtra.gov.in









# संघर्षाचा 'जयंत' प्रवास



एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री

**शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस, माजी आमदार आणि महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक क्षेत्रातील एक अत्यंत ज्येष्ठ व आदरणीय व्यक्तिमत्त्व, आदरणीय भाई जयंत पाटील यांना ७१ व्या वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांच्या वाढदिवसानिमित्त 'कृषीवल' प्रकाशित करीत असलेल्या विशेषांकासही माझ्या शुभेच्छा.**

जयंतभाई आणि माझा स्नेह अनेक वर्षांचा आहे. पक्षीय राजकारणाचे तट आणि भिंती बाजूला ठेवून ज्या नेत्यांनी नेहमीच महाराष्ट्राच्या, विशेषतः कोकणच्या हिताला आणि विकासाला प्राधान्य दिले, त्यात जयंतभाईंचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल.लाल बावट्याच्या विचारांशी आणि शेकापच्या तत्त्वांशी आयुष्यभर प्रामाणिक राहात त्यांनी जनसामान्यांची अविरत सेवा केली आहे. जयंतभाईंच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वात मोठा गुण म्हणजे त्यांची वैचारिक स्पष्टता आणि सर्वसमावेशकता. राजकारणात अनेक चढ-उतार आले; पण त्यांनी आपली शेतकरी आणि कष्टकऱ्यांविषयीची बांधीलकी कधीही सोडली नाही. सर्वपक्षीय नेत्यांशी त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे आणि आदराचे संबंध आहेत. ते आजच्या राजकारणातील खऱ्या अर्थाने 'अजातशत्रू' नेते आहेत. समोरचा व्यक्ती कोणत्याही विचारसरणीचा असो, त्याच्या चांगल्या कामाचे कौतुक करण्याचे मोठेपण आणि राज्याच्या हितासाठी एकत्र येण्याची परिपक्वता जयंतभाईंकडे आहे.

विधानपरिषदेत आमदार म्हणून काम करताना जयंतभाईंनी आपल्या अमोघ वक्तृत्वाने आणि अभ्यासू वृत्तीने सभागृहाचा दर्जा नेहमीच उंचावला. कोकणातील सिंचनाचे प्रश्न असोत, मच्छिमारांच्या समस्या असोत की मुंबई-गोवा महामार्गाचा विषय; जयंतभाईंकडे प्रत्येक विषयाची आकडेवारी आणि सखोल अभ्यास असायचा. त्यांचे भाषण म्हणजे केवळ राजकीय टीका नसायची, तर त्यात तळागाळातील माणसाच्या व्यथा आणि त्यावरचे कायदेशीर उपाय असायचे.

प्रशासकीय नियमांची अचूक माहिती आणि त्याचा जनतेच्या हितासाठी कसा वापर करायचा, याचे उत्तम कौशल्य त्यांच्याकडे आहे. जयंतभाईंची काम करण्याची पद्धत अतिशय थेट, आक्रमक आणि तितकीच परिणामकारक आहे. त्यांच्या कार्यपद्धतीची काही प्रमुख वैशिष्ट्ये सांगता येतील. एकदा प्रश्न हाती घेतला, की तो तडीस नेल्याशिवाय थांबायचे नाही, हा त्यांचा बाणा आहे. मंत्रालयात किंवा कोणत्याही शासकीय पातळीवर आपल्या भागातील लोकांचे प्रश्न सोडवताना ते अत्यंत आग्रही असतात. शासकीय अधिकाऱ्यांकडून लोकहिताची कामे कशी करून घ्यायची, याचे अचूक कसब त्यांना अवगत आहे. त्यांच्या या अभ्यासू आणि करारी पद्धतीमुळे प्रशासनही त्यांच्या शब्दाला कधी टाळू शकत नाही. आजही ७१ व्या वर्षात पदार्पण करताना त्यांचा उत्साह तरुण कार्यकर्त्याला लाजवेल असा आहे. रायगड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात कार्यकर्त्यांचे जाळे सांभाळणे, त्यांच्या सुख-दुःखात धावून जाणे आणि थेट जनतेमध्ये वावरणे, हीच त्यांच्या कामाची ऊर्जा आहे. जयंतभाई पाटील यांचे नेतृत्व हे महाराष्ट्राच्या राजकीय सुसंस्कृततेचे एक उत्तम उदाहरण आहे. त्यांनी उभारलेले सहकार क्षेत्रातील कार्य आणि अलिबाग परिसराच्या विकासातील त्यांचे योगदान सदैव मार्गदर्शक राहील. अशा या ज्येष्ठ आणि मार्गदर्शक लोकनेत्याला दीर्घायुष्य आणि उत्तम आरोग्य लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना! जयंतभाईंना वाढदिवसाच्या पुन्हा एकदा मनःपूर्वक शुभेच्छा!

# विचारांचा वारसा जपणारे नेतृत्व

**शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस तथा माजी आमदार आदरणीय श्री. जयंत (भाई) पाटील यांना ७१ व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!**



सुनेत्रा अजित पवार, उपमुख्यमंत्री

समाजकारण, राजकारण आणि सहकार या तिन्ही क्षेत्रांमध्ये आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणारे आदरणीय भाई जयंत पाटील हे महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील एक अभ्यासू, संयमी आणि तत्त्वनिष्ठ नेतृत्व म्हणून सर्वपरिचित आहेत. सामाजिक, राजकीय आणि सहकार क्षेत्रात भाई जयंत पाटील यांनी दिलेले योगदान अत्यंत उल्लेखनीय आहे. जनसामान्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देत लोकहिताचा सातत्याने पुरस्कार करणारे नेतृत्व म्हणून त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक जडणघडणीत त्यांनी बजावलेली भूमिका आणि विविध क्षेत्रांत घेतलेले दूरदृष्टीचे निर्णय प्रेरणादायी ठरले आहेत.

रायगड जिल्ह्याच्या विकासात, शेतकरी, कष्टकरी, कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने आवाज उठविला. विधानमंडळातील अभ्यासपूर्ण मांडणी, लोकहिताच्या प्रश्नांवरील ठाम भूमिका आणि समाजातील वंचित घटकांप्रती असलेली संवेदनशीलता यामुळे त्यांनी जनमानसात विश्वासार्ह नेतृत्वाची प्रतिमा निर्माण केली आहे. लोकाभिमुख विचार, तत्त्वनिष्ठ राजकारण आणि समाजहिताची अखंड बांधीलकी या गुणांमुळे त्यांनी अनेक कार्यकर्त्यांसाठी आदर्श निर्माण केला आहे. सार्वजनिक जीवनातील त्यांची प्रदीर्घ आणि समर्पित वाटचाल भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहे.





# पुरोगामी राजकारणातील अभ्यासू तत्त्वनिष्ठ, संयमी नेतृत्व






**आ. रोहित पवार**
**महाराष्ट्र विधानसभा**

महाराष्ट्राच्या पुरोगामी राजकारणातील अभ्यासू, तत्त्वनिष्ठ आणि संयमी नेतृत्व म्हणून ज्येष्ठ नेते, शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस तथा माजी आमदार भाई जयंत पाटील साहेब यांचं नाव अत्यंत आदराने घेतलं जातं. सामाजिक न्याय, सहकार चळवळ, शेतकरी-शेतमजूर, कष्टकरी आणि सर्वसामान्य माणसाच्या प्रश्नांप्रती असलेली त्यांची सातत्यपूर्ण बांधिलकी ही त्यांच्या सार्वजनिक जीवनाची खरी ओळख आहे.

आदरणीय पवारसाहेब आणि शेतकरी कामगार पक्ष यांचा अनेक दशकांचा वैचारिक स्नेह, सहकार्य आणि परस्पर विश्वासाचं नातं महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात विशेष महत्त्वाचं राहिलं आहे. या नात्याला अधिक दृढ करण्यामध्ये मा. जयंतभाईचं योगदान अत्यंत मोलाचं आहे. मतभेद असले तरी संवाद कायम ठेवणं, विचारांशी तडजोड न करता लोकहिताला सर्वोच्च प्राधान्य देणं आणि राज्याच्या व्यापक हितासाठी विधायक भूमिका मांडणं, ही त्यांची राजकीय कार्यपद्धती निश्चितच प्रेरणादायी आहे.

आजच्या बदलत्या राजकीय परिस्थितीतही महाराष्ट्राच्या राजकारणात विवेकपूर्ण, अभ्यासपूर्ण आणि संतुलित भूमिका मांडणारे ज्येष्ठ नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे सर्वच पक्षांचे नेते, कार्यकर्ते आदराने पाहतात. त्यांच्या अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा लाभ राज्याच्या सार्वजनिक जीवनाला आणि सामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक बदलाचं स्वप्न घेऊन राजकारणात आलेल्या माझ्यासारख्या व्यक्तीलाही यापुढेही कायम मिळत राहावा, ही अपेक्षा. त्यासाठी मा. जयंतभाईंना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभो. समाजहित, लोकशाही मूल्ये आणि पुरोगामी विचारांचा त्यांचा प्रवास असाच अधिक जोमाने सुरू राहो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. मा. जयंतभाईना ७१ व्या वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!

# तत्त्वनिष्ठ नेतृत्व

**शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य जनतेच्या हक्कांसाठी सातत्याने संघर्ष करणारे, सहकार क्षेत्राला दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व देणारे आणि लोकाभिमुख राजकारणाचा आदर्श जपणारे मा. भाई जयंत पाटील यांना ७१व्या वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!**



**सचिन अहिर**
**उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद**

सार्वजनिक जीवनात पाच दशकांहून अधिक काळ भाईंनी लोकहिताला केंद्रस्थानी ठेवून केलेली अविरत वाटचाल महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी ठरली आहे. विचारांना, तत्त्वांना आणि जनतेच्या न्याय्य हक्कांना प्राधान्य देत त्यांनी उभारलेले नेतृत्व आजच्या राजकारणात वेगळा आदर्श निर्माण करणारे आहे.

सहकार क्षेत्रातील त्यांची दूरदृष्टी, प्रशासनावरील सखोल अभ्यास, कायद्याचे भक्कम ज्ञान आणि विकासाचा समतोल दृष्टिकोन यामुळे अनेक महत्त्वाचे निर्णय जनहिताच्या बाजूने घडून आले. अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने केलेला संघर्ष, कार्यकर्त्यांशी जपलेला आत्मीय संवाद आणि समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याची त्यांची संवेदनशीलता हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य राहिले आहे. भाईंच्या व्यक्तिमत्त्वातील साधेपणा, संयम, प्रामाणिकपणा आणि कार्यकर्त्यांप्रती असलेली आपुलकी यामुळे त्यांनी केवळ एक राजकीय नेता म्हणून नव्हे, तर अनेक पिढ्यांसाठी प्रेरणास्थान म्हणून ओळख निर्माण केली. विचारांशी प्रामाणिक राहून समाजहितासाठी सातत्याने कार्य करण्याची त्यांची वृत्ती प्रत्येकाला नवी ऊर्जा देणारी आहे.

भाई जयंत पाटील यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, सुख, समाधान आणि अखंड यश लाभो. त्यांच्या अनुभवी, अभ्यासू आणि लोकाभिमुख नेतृत्वाखाली समाजसेवा, लोककल्याण आणि जनहिताची ही प्रेरणादायी वाटचाल अशीच अधिक व्यापक स्वरूपात पुढे सुरू राहो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. भाईंना ७१व्या वाढदिवसानिमित्त पुन्हा एकदा मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

## जयंतभाईंना जे पाहिलंय, अनुभवलंय ते!!!

राजकारणातले बाळकडू प्यालेले
भाई सुदृढ घडलेले,
टप्प्या-टप्प्यावर चढलेल्यांना,
हात देऊन मोठेही केले
वरच्या-खालच्या गल्लीतले
सामाजिक, राजकीय,
आर्थिक मैदानातले मी सर्वत्र
पाहिलेत... सच्चाईच्या गावातले...
जयंतभाई...!!

चाळीस-पन्नास वर्षे सरून गेली
सहजा चाल कधी ना चुकली
घराण्याची राजकीय गर्द सावली
लहान-थोरांच्या अंगावर आली
समाज बैठक गावोगावी झाली
शेतकरी, कामगार, कलाकारातली
ओळखून प्रेरणादायी दाद दिली
लाल बावट्याने आपले झाले
सच्याईच्या गावातले.....जयंतभाई!

एकतेची उमेद भरधाव सुटली
आर्थिक ताकद बँकांतून भरली
साहित्य, संस्कृती, समाज, शिक्षण
एकदिलाने रायगडभर झिरपली
समाज बांधवांनी फळी बांधली
खटाऱ्यातून धूळ उडत राहिली
विकासाची समाज रचना झाली
ते सारे सारे आम्ही पाहिले
सच्याईच्या गावातले.... जयंतभाई..!

राजधर्माने जोवर जे जे चालले
चुकामाकात समजूनही घेतले
खोक्यातून डोके राजकारणातले
घरादाराचे जेव्हा छुपे डाव पडले
संधीसाधू दूर दूर पळू लागले
उरले जे जे मावळे जपून ठेवले
नारीशक्तीनेही बळ जेव्हा दिले
राखेतून फिनिक्स पक्षी बनले
सच्याईच्या गावातले.. जयंतभाई..!

पक्के केले आता थांबणे नाही
चोरांविरुध्द भरले आव्हान देही
तिकडे राम मंदिरी चोरी झालीही
दानपेटी भामट्यांनी लुटलीही
जाणीव मावळ्यांना मनी झाली
देश उठावा खूणगाठ बांधलीही
जेथे न्याय्य तीच वृत्ती ठरलीही
उद्याचे भाई आजच सज्ज झाले
सच्याईच्या गावातले... जयंतभाई..!!!

**आगरी साहित्यरत्न रायगडभूषण**
**प्रा. एल.बी. पाटील**
**शेकाप सामान्य कार्यकर्ता**
**नवघर-उरण**

# लोकहितासाठी झटणारे अभ्यासू नेतृत्व



**रायगड जिल्ह्याचे सुपुत्र, बँकिंग आणि सहकार क्षेत्राचा सखोल अभ्यास असलेले, तसेच सलग २४ वर्षे महाराष्ट्र विधानपरिषदेचे सन्माननीय सदस्य म्हणून राज्यातील विविध प्रश्नांवर प्रभावी भूमिका बजावणारे माझे ज्येष्ठ सहकारी आणि मार्गदर्शक आदरणीय भाई जयंत पाटील यांचे वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक अभिष्टचिंतन आणि हार्दिक शुभेच्छा.**



**आ. प्रवीण दरेकर (कॅबिनेट मंत्री दर्जा)**

शेतकरी कामगार पक्षाचे नेते म्हणून त्यांनी शेतकरी, कष्टकरी आणि कामगारांच्या प्रश्नांसाठी सातत्याने रस्त्यावर उतरून संघर्ष केला आहे. त्याचबरोबर विधानपरिषदेच्या सभागृहातही त्यांनी शेतकरी, कामगार, दुष्काळग्रस्त, भूमीपुत्र, कोकण किनारपट्टीवरील मच्छिमार, भात उत्पादक शेतकरी तसेच फळबागायतदार यांच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडली. हे प्रश्न केवळ मांडण्यापुरते न राहता त्यावर सखोल चर्चा घडवून आणणे आणि शासनाकडून सकारात्मक निर्णय व्हावेत यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला.

जनतेच्या प्रश्नांबद्दलची त्यांची तळमळ आणि अभ्यासपूर्ण मांडणी नेहमीच लक्षवेधी ठरली. सहकार क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. सहकारी बँका, रायगड बाजार, विविध शैक्षणिक उपक्रम आणि सहकारी संस्थांच्या बळकटीसाठी त्यांनी केलेले कार्य आजही या क्षेत्रातील कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांसाठी प्रेरणादायी आहे. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे नेतृत्व करताना त्यांनी आधुनिक, पारदर्शक आणि सक्षम सहकार व्यवस्थेचा आदर्श निर्माण केला.

मी मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कामकाजाची जबाबदारी सांभाळत असताना सहकारी बँका, सहकारी संस्था आणि एकूणच सहकार चळवळीच्या विविध विषयांवर भाईसोबत अनेक वेळा सखोल चर्चा करण्याची संधी मिळाली. राजकीय विचार वेगवेगळे असले तरी सहकार आणि लोकहिताच्या प्रश्नांवर आम्ही नेहमीच विधायक भूमिका घेत एकत्रितपणे काम केले. त्यांचा अभ्यास, अनुभव आणि व्यापक दृष्टीकोन यांचा मला नेहमीच लाभ झाला.

भाई जयंत पाटील यांचे सार्वजनिक जीवन हे संघर्ष, अभ्यास, संयम आणि लोकहिताची अखंड बांधिलकी यांचे उत्तम उदाहरण आहे. त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा लाभ समाजाला आणि राज्याला पुढील काळातही मिळत राहो. त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अखंड कार्यशक्ती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. पुन्हा एकदा भाई जयंत पाटील यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!





# लोकनेते भाई जयंत पाटील



**रायगड जिल्ह्याच्या चार पिढ्यांच्या सामाजिक, राजकीय आणि सहकारी वाटचालीचे साक्षीदार ठरलेले लोकनेते भाई जयंत पाटील यांचा ७१ वा वाढदिवस मंगळवार, दि. ७ जुलै २०२६ रोजी उत्साहात साजरा होत आहे. या आनंददायी प्रसंगी त्यांना मनःपूर्वक वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! ईश्वर त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि समाजसेवेची अखंड ऊर्जा देवो, हीच प्रार्थना. त्यांच्या प्रदीर्घ सार्वजनिक जीवनावर आधारित विशेषांक प्रकाशित होत असल्याचे समजले आणि त्याचा विशेष आनंद वाटला.**

**हर्षवर्धन सपकाळ**
**अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी**

राज्यात प्रतिगामी प्रवृत्तीची शक्ती सत्तेवर आल्यानंतर शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचा वारसा जपणारे विविध पक्ष एकत्र आले आणि महाविकास आघाडीची स्थापना झाली. या आघाडीच्या उभारणीत, विशेषतः रायगडच्या मातीत शेतकरी, कष्टकरी आणि श्रमिकांच्या हक्कांसाठी सातत्याने बुलंद आवाज उठवणारे लोकनेते भाई जयंत पाटील यांनी महत्त्वपूर्ण आणि नेतृत्वकारी भूमिका बजावली. ख्यातनाम विधिज्ञ स्वर्गीय ॲड. दत्ता पाटील, आजोबा स्व. ना.ना. पाटील (आप्पासाहेब) आणि वडील स्व. प्रभाकर नारायण पाटील यांच्या वैचारिक मार्गदर्शनातून भाई जयंत पाटील यांचे व्यक्तिमत्त्व घडले. शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून त्यांनी अन्यायाविरुद्ध संघर्ष आणि जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने लढा दिला. ज्येष्ठांनी दिलेला पुरोगामी वैचारिक वारसा त्यांनी केवळ जपलाच नाही, तर तो अधिक व्यापक केला.

पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य आणि विधानपरिषदेचे सदस्य अशा विविध जबाबदाऱ्या सांभाळताना त्यांनी कोकणातील विकास, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि सर्वसामान्यांच्या हिताच्या मुद्द्यांवर सरकारला अनेकदा धारेवर धरले. आजही शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस म्हणून ते तितक्याच ताकदीने जनतेच्या प्रश्नांसाठी कार्यरत आहेत. जमिनीशी नाळ जोडून सुरू झालेला त्यांचा राजकीय प्रवास आजही तितकाच जनताभिमुख आणि संघर्षशील आहे.

राजकारणाबरोबरच शिक्षण आणि सहकार क्षेत्रातही भाई जयंत पाटील यांचे योगदान उल्लेखनीय आहे. पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेद्वारे त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला, तर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला आधुनिक आणि सक्षम बनविण्यातही त्यांनी मोलाची भूमिका बजावली. त्यांच्या कार्यामुळे अनेक तरुणांना दिशा, प्रेरणा आणि नेतृत्वाची नवी दृष्टी मिळाली आहे. समाजकारण, सहकार, शिक्षण आणि जनतेच्या हक्कांसाठी आयुष्यभर झटणाऱ्या या लोकनेत्यास ७१ व्या वाढदिवसानिमित्त पुन्हा एकदा मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा! त्यांची निरोगी, दीर्घ आणि यशस्वी वाटचाल अशीच सुरू राहो, हीच सदिच्छा.

# अष्टपैलू नेतृत्व भाई जयंत पाटील

७ जुलै हा शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आणि आमचे लाडके नेते भाई जयंत पाटील यांचा वाढदिवस. गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही सर्व कार्यकर्ते प्रेमाने, जिव्हाळ्याने आणि अभिमानाने भाईंना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी एकत्र येत असतो. हा केवळ वाढदिवस नसून, आमच्यासाठी प्रेरणादायी नेतृत्वाला कृतज्ञतेने अभिवादन करण्याचा दिवस असतो.

भाई जयंत पाटील हे खऱ्या अर्थाने अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आहेत. शिक्षण, सहकार, उद्योग, व्यवसाय, राजकारण आणि समाजकारण अशा प्रत्येक क्षेत्रात त्यांनी आपल्या दूरदृष्टी, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांनी गाठलेले यश हे केवळ वैयक्तिक नसून, रायगड आणि महाराष्ट्राच्या अभिमानाचा विषय आहे.

स्वत:चे खासगी बंदर उभारण्याची दूरदृष्टी, ॲल्युमिनियम बोटींचा अत्याधुनिक उद्योग उभारणे, आधुनिक प्रिंटिंग प्रेसच्या माध्यमातून उद्योगक्षेत्रात वेगळा ठसा उमटवणे, तसेच रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला देशातील अग्रगण्य सहकारी बँकांच्या पंक्तीत नेऊन उभे करणे, ही त्यांच्या दूरदृष्टीची आणि कार्यक्षम नेतृत्वाची जिवंत उदाहरणे आहेत.



या प्रत्येक यशामागे कल्पकता, अथक परिश्रम, चिकाटी आणि ध्येयवेडी वृत्ती दडलेली आहे.

राजकारणातही भाई जयंत पाटील यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भूमिकेने, स्पष्ट विचारांनी आणि तळागाळातील जनतेशी असलेल्या घट्ट नात्यामुळे महाराष्ट्रभर वेगळा नावलौकिक मिळवला आहे. शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर सातत्याने संघर्ष करणारे, तत्त्वांशी तडजोड न करणारे नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे आदराने पाहिले जाते. अशा कर्तृत्ववान, दूरदृष्टी असलेल्या आणि समाजहिताला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या नेत्याचा कार्यकर्ता असल्याचा मला मनापासून अभिमान आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची संधी मिळणे, हे माझ्यासारख्या कार्यकर्त्याचे भाग्य आहे.



माजी आमदार बाळाराम पाटील

शेतकरी कामगार पक्षाच्या तमाम कार्यकर्ते, पदाधिकारी आणि हितचिंतकांच्यावतीने भाई जयंत पाटील यांना वाढदिवसानिमित्त लाख लाख शुभेच्छा! त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो, हीच सदिच्छा.

लाल सलाम!

# राजकारणापलीकडचं मित्रत्व!

**राजकारणात विचारधारा वेगळ्या असू शकतात, पक्ष वेगळे असू शकतात, निवडणुकांच्या रणधुमाळीत एकमेकांवर टीकेची झोडही उठत असते. मात्र, या सगळ्याच्या पलीकडे जात मित्रत्व जपलं, ते शेतकरी कामगार पक्षाचे सर्वेसर्वा सरचिटणीस जयंत पाटील यांनी. राजकीय संस्कृती, परस्परांबद्दलचा आदर आणि वैयक्तिक स्नेह हीच लोकशाहीची खरी ताकद असते, हे भाई जयंत पाटील यांनी नेहमीच दाखवून दिलेय. त्यांना वाढदिवसानिमित्त कोटी कोटी शुभेच्छा!**



रायगड जिल्ह्याच्या राजकारणात जयंत पाटील हे प्रभावी व्यक्तिमत्त्व आहे. आम्ही दोघेही वेगवेगळ्या राजकीय विचारांचे प्रतिनिधित्व करत असलो, तरी जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने काम करणारा नेता म्हणून त्यांची स्वतंत्र ओळख आहे.

ना. भरत गोगावले
रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारजमीन विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य

अनेक निवडणुकांमध्ये ते राजकीयदृष्ट्या आमनेसामने आले, आरोप-प्रत्यारोप झाले; पण वैयक्तिक संबंधांमध्ये कधीही कटुता निर्माण होऊ दिली नाही. राजकारणात विरोध हा विचारांचा असतो, व्यक्तीचा नसतो, ही भूमिका भाई जयंत पाटील यांनी आपल्या सार्वजनिक जीवनातून अनेकदा अधोरेखित केली आहे.

जयंत पाटील त्यांच्या स्पष्टवक्तेपणासाठी आणि रोखठोक स्वभावासाठी ओळखले जातात. ज्या मुद्द्यावर भूमिका घ्यायची, ती ठामपणे मांडायची, हा त्यांचा स्वभाव आहे. मात्र, त्याचवेळी राजकीय विरोधकांशी वैयक्तिक स्नेह जपण्याची संस्कृतीही त्यांनी कायम ठेवली आहे. शेकापचे सरचिटणीस म्हणून जयंत पाटील यांनी रायगडसह कोकणाच्या राजकारणात दीर्घकाळ प्रभावी भूमिका बजावली आहे. शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने आवाज उठवला. त्यामुळे पक्षीय सीमा ओलांडून अनेक नेत्यांमध्ये त्यांच्याविषयी आदराची भावना आहे. राजकारणात संघर्ष असतो, जय-पराजय असतो, आरोप-प्रत्यारोपही होत असतात. मात्र, या सगळ्यापलीकडे एकमेकांविषयीचा आदर, जिव्हाळा आणि सार्वजनिक जीवनातील संस्कार जपणारे नेतेच समाजाला योग्य दिशा देतात. त्या नेत्यांपैकी एक म्हणजे भाई जयंत पाटील. जयंतभाईंना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि निरंतर जनसेवेसाठी शुभेच्छा. समाजकारणातील त्यांचा अनुभव आणि कार्याचा वारसा पुढील अनेक वर्षे जनतेच्या सेवेसाठी उपयोगी पडो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.



# संघर्षातून घडलेले लोकनेतृत्व

**आदरणीय श्री. जयंत (भाई) पाटील यांना वाढदिवसानिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा!**

कष्टकरी, शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने संघर्ष करणारे, तत्त्वनिष्ठ राजकारणाची परंपरा जपणारे आणि लोकहिताला सर्वोच्च प्राधान्य देणारे शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस तथा माजी आमदार जयंत पाटील यांचे नेतृत्व महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील एक प्रेरणादायी पर्व आहे. शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस म्हणून त्यांनी अनेक दशकांपासून शेतकरी, कामगार, कष्टकरी जनतेच्या हितासाठी कार्य केले. जयंत पाटील अनेक दशकांपासून लोकहिताची भूमिका अत्यंत अभ्यासपूर्ण, संयमी व प्रभावीपणे पार पाडली.



शेतकरी व कष्टकरी वर्गाच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी वेळोवेळी रस्त्यावर उतरून संघर्ष केला. अन्यायाविरोधातील विविध प्रश्नांना सातत्याने वाचा फोडण्याचे कार्य केले.

आ. महेंद्र सदाशिव थोरवे, कर्जत

विधान परिषदेतील त्यांच्या प्रभावी मांडणीमुळे अनेक लोकहिताचे प्रश्न शासनाच्या निदर्शनास आले असून, त्यातून सर्वसामान्य जनतेला दिलासा मिळण्यास हातभार लागला आहे. विकासकामे, सहकार, शिक्षण, रोजगार, पायाभूत सुविधा आणि ग्रामीण प्रश्नांवर त्यांनी घेतलेली ठाम भूमिका जनतेच्या हिताची ठरली आहे. त्यांची साधी राहणी, जनतेशी असलेली घट्ट नाळ, सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची कार्यशैली आणि समाजहितासाठीची नि:स्वार्थ बांधीलकी ही प्रत्येक लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आहे. सार्वजनिक जीवनातील त्यांचे योगदान आणि लोकसेवेप्रती असलेली निष्ठा निश्चितच अनुकरणीय आहे.

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी, सहकार चळवळीच्या बळकटीसाठी आणि ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी केलेले कार्य नेहमीच स्मरणात राहील. ईश्वरचरणी प्रार्थना आहे की, जयंत पाटील यांना निरोगी, दीर्घायुषी लाभो. समाजहिताची आपली सेवायात्रा अशीच अखंड सुरू राहो आणि आपल्या अनुभवाचा लाभ जनतेला दीर्घकाळ मिळत राहो, हीच सदिच्छा.



# रणांगणातील योद्धा भाई जयंत पाटील

पूर्वी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर अलिबागला आवर्जून येत. कधी विश्रांतीसाठी, तर कधी शेतकरी परिषदांसाठी. त्या काळात अलिबागमध्ये त्यांचा मुक्काम असायचा तो भाई नारायण नागू पाटील यांच्या घरी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेची अनेक पाने त्या घरात लिहिली, हे आज अनेकांना अविश्वसनीय वाटेल. पण, ते सत्य आहे. नारायणरावांचे घर बाबासाहेबांचे हक्काचे घर होते. चुलीवरची तांदळाची भाकरी आणि जिताड्याचे कालवण नारायणरावांच्या पत्नी आपल्या भावासारख्या दिरासाठी प्रेमाने बनवत असत. बाबासाहेब आणि नारायणराव यांचे नाते हे केवळ राजकीय नव्हते; ते संघर्षातून घडलेले बंधुत्व होते. शेतकरी आंदोलनाच्या रणांगणात जुळलेली ती मैत्री आयुष्यभर टिकली. मुंबई विधान परिषदेतही दोघेही एकत्र सदस्य होते. महाराष्ट्रातील पहिल्या आणि सर्वात मोठ्या शेतकरी संपाचे प्रणेते म्हणून भाई नारायण नागू पाटील यांचे नाव इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे.



**कपिल पाटील**
अध्यक्ष, हिंद मजदूर किसान पंचायत (HMKP), महाराष्ट्र राज्य

शेतकरी कामगार पक्ष हा एकेकाळी महाराष्ट्रातील सर्वात प्रभावी राजकीय पक्षांपैकी एक होता. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचारांचा वारसा आणि कार्ल मार्क्सच्या शोषणविरोधी तत्त्वज्ञानाची सांगड घालण्याचे विलक्षण कार्य या पक्षाने केले. मा. शरदजी पवार साहेब यांच्या आई शारदाबाई पवार, कृष्णराव धुळप, भाई उद्धवराव पाटील, स्व. दि.बा. पाटील, प्रा. एन.डी. पाटील, गणपतराव देशमुख अशा अनेक दिग्गजांनी हा विचार महाराष्ट्रभर पोहोचवला. त्या पक्षाच्या संस्थापक नेत्यांमध्ये भाई नारायण नागू पाटील अग्रस्थानी होते. भाई जयंत पाटील हे त्याच नारायण नागू पाटील यांचे नातू. त्यांच्यातील लढाऊ बाणा हा वारशाने आलेला आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्यालयावर आजही एक कोनशिला आहे. त्यावर तत्कालीन अध्यक्ष प्रभाकर पाटील यांनी लिहून ठेवलेले शब्द आजही प्रेरणा देतात; ते म्हणजे, ''सेवेचे ठायी तत्पर, पाटील प्रभाकर.''

हेच प्रभाकर पाटील म्हणजे भाई जयंत पाटील यांचे वडील. सेवाभाव, जनतेशी नाळ आणि संघर्षाची परंपरा त्यांनी आपल्या मुलाला दिली. स्वातंत्र्य चळवळ, सत्यशोधक विचार, शेतकऱ्यांच्या हक्कांची लढाई, विस्थापनाविरोधातील संघर्ष आणि छातीवर गोळ्या झेलण्याची बलिदानी परंपरा हा रायगडातील शेतकरी कामगार पक्षाचा इतिहास आहे. तोच इतिहास भाई जयंत पाटील यांच्या व्यक्तिमत्त्वातून जिवंत दिसतो. विधान परिषदेच्या सभागृहात ते उभे राहिले की, अन्यायाविरुद्ध शब्दांचा जणू ज्वालामुखीच उसळायचा. एखादा प्रश्न सोडविल्याशिवाय ते मागे हटत नसत. राग आला की त्यांना शांत करणे कठीण; पण एकदा ते शांत झाले की त्यांच्याइतका प्रेमळ आणि जिव्हाळ्याचा माणूस क्वचितच भेटतो. महाराष्ट्राच्या विधिमंडळाने दोन लढवय्ये नेते दीर्घकाळ पाहिले. विधानसभेत भाई गणपतराव देशमुख आणि विधान परिषदेत भाई जयंत पाटील. दोघेही आपल्या विचारांसाठी शेवटपर्यंत उभे राहिले. रणांगणातील योद्ध्यासारखे. पण, भाईंचे आणखी एक वेगळे रूप होते. सभागृहाबाहेर शेकापच्या कार्यालयात त्यांचा डब्बा सर्व पक्षांच्या नेत्यांसाठी खुला असायचा. जिताड्याचे कालवण, तळलेला जिताडा आणि सुकटीची चटणी खाण्यासाठी अक्षरशः रांग लागायची. विरोधक आणि सत्ताधारी असा भेद तिथे कधीच नव्हता. विधिमंडळात वार न पाळणारे दोन, चारच लोक होते. पूर्वी गणपतराव देशमुख, मग विलासकाका पाटील उंडाळकर होते. नंतर भाई जयंत पाटील, बंटी पाटील आणि मी. त्यात भाई आणि माझा दिवस सुकटीशिवाय जात नसे. भाईंनी राजकारणात मैत्रीचा पूल उभारला तो विचारांइतकाच जेवणातूनही. मैत्री पोटातून मनात जाते, याचा त्यांनी अनेकदा अनुभव दिला. आज भाई जयंत पाटील सत्तरी ओलांडूनही तितक्याच जोमाने कार्यरत आहेत. उत्साह, संघर्षाची तयारी आणि पुरोगामी विचारांवरील निष्ठा आजही तसूभर कमी झालेली नाही. महाराष्ट्रातील डाव्या, पुरोगामी आणि शेतकरी चळवळीचा ते अजूनही एक मजबूत आधारस्तंभ आहेत. संघर्ष हा त्यांचा धर्म आहे. साधेपणा ही त्यांची ओळख आहे. आणि, जनतेसाठी लढणे हेच त्यांचे आयुष्य.

भाई जयंत पाटील यांना लाल सलाम! निरोगी, दीर्घायुष्य लाभो आणि संघर्षाची ही मशाल अशीच तेजाने प्रज्वलित राहो, हीच मनःपूर्वक शुभेच्छा.

# कष्टकरी, वंचितांचा बुलंद आवाज

**राजकारणाच्या प्रवासात अनेक मित्र भेटतात. काही काळापुरते सहकारी ठरतात, तर काही प्रवासातील सोबती बनतात. पण, काही मोजकीच माणसे अशी असतात की, पक्ष, विचारसरणी आणि राजकीय सीमा ओलांडून ती आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनतात. असे माझे स्नेही आणि काबाडकष्ट करणाऱ्या शेतकरी, शेतमजूर, घाम गाळणारे कामगार बांधव आणि वंचितांचा बुलंद आवाज म्हणजे भाई जयंत पाटील.**

महाराष्ट्र विधान परिषदेत सलग चार वेळा निवडून येणारे शेतकरी कामगार पक्षाचे आधारस्तंभ माजी आमदार भाई जयंत प्रभाकर पाटील यांनी आपले वडील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक स्व. प्रभाकर पाटील यांच्या पावलावर पाऊल ठेवून समाजकारणात प्रवेश केला. मात्र, जयंतभाईंनी महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतंत्र स्थान निर्माण केले. सार्वजनिक जीवनात प्रवेश केला आणि सामान्य माणसाच्या प्रश्नांना आपले ध्येय मानले. शेतकरी कामगार पक्षाचे खंदे नेते म्हणून त्यांनी शेतकरी, कामगार आणि वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष केला. आंदोलने, जनजागृती आणि विधिमंडळातील प्रभावी मांडणी यांच्या माध्यमातून त्यांनी दुर्लक्षित वर्गाला आवाज दिला. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आणि सर्वसामान्यांच्या न्यायासाठी ते नेहमीच आघाडीवर राहिले.

**'अतूट मैत्री'**

जयंतभाई आणि माझी मैत्री ही केवळ राजकारणापुरती मर्यादित नाही. महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय पटावर अनेक दशकांपासून आमचे ऋणानुबंध जुळले आहेत. मी मुंबईतील कामगार, कष्टकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी लढत आलो, तर जयंतभाईंनी रायगडसह संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी, कामगार आणि वंचित घटकांचा आवाज बुलंद ठेवला. पक्ष वेगवेगळे असले तरी आमच्या विचारांचा पाया हा सामान्य माणसाच्या संघर्षातून घडलेला आहे. त्यामुळेच आमच्या नात्यात राजकारणापलीकडचा जिव्हाळा निर्माण झाला.

**'विधिमंडळातील आमची जुगलबंदी'**

विधान परिषदेच्या सभागृहात जयंतभाईंची उपस्थिती नेहमीच प्रभावी वाटायची. संसदीय कामकाजावरील त्यांचा अभ्यास, विषयांची सखोल जाण आणि नेमक्या शब्दांत मुद्दा मांडण्याची हातोटी यामुळे ते बोलण्यासाठी उभे राहिले की, सभागृहाचे लक्ष आपोआप त्यांच्याकडे वळायचे. अनेकदा सभागृहात वातावरण तापलेले असायचे. सत्ताधारी आणि विरोधकांमधील शाब्दिक चकमकींनी तणाव वाढलेला असायचा. अशा वेळी जयंतभाई एखादा मिश्कील टोला किंवा एखादा प्रसंग सांगून वातावरण हलकेफुलके करायचे. त्यांचा हा स्वभाव सभागृहातील अनेक तणावपूर्ण प्रसंग सहजपणे निवळवून टाकायचे. मी स्वतः कामगार आणि मुंबईच्या प्रश्नांवर बोलताना अनेकदा अत्यंत आक्रमक भूमिका घेत असे. काही वेळा भावनांच्या भरात आवाजही चढायचा. अशा वेळी माझ्या शेजारी बसलेले जयंतराव शांतपणे माझ्याकडे पाहायचे, हळूच हातावर हात ठेवून म्हणायचे, ''भाई, मुद्द्यावर बोला... विषय सुटता कामा नये.'' त्यांचे हे शब्द आजही कानात घुमतात. तो सल्ला एखाद्या ज्येष्ठ सहकाऱ्याचा नव्हे, तर मोठ्या भावाच्या प्रेमळ मार्गदर्शनाचा असायचा.

**कोकण, कष्टकरी आणि जिव्हाळ्याचे नाते**

माझी मुळे रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यात रुजलेली आहेत, तर जयंतभाईंचे संपूर्ण राजकीय आयुष्य रायगडच्या मातीत फुलले आहे. त्यामुळे कोकणाशी असलेली आमची नाळ अधिक घट्ट आहे. मुंबई आणि कोकण यांचे नाते जसे अविभाज्य आहे, तसेच काहीसे आमच्या मैत्रीचेही आहे. मुंबईतील कोकणी चाकरमान्यांचे प्रश्न असोत, गिरणी कामगारांच्या पुनर्वसनाचा विषय असो किंवा कोकणातील शेतकऱ्यांच्या जमिनी, पाणी आणि रोजगाराचे प्रश्न असोत, जयंतरावांनी नेहमीच संवेदनशील भूमिका घेतली. अनेक प्रसंगी त्यांनी माझ्या भूमिकेला ठाम पाठिंबा दिला आणि सामान्य माणसाच्या बाजूने खंबीरपणे उभे राहिले.



**भाई जगताप,**
**सदस्य, विधान परिषद**

राजकारणात मतभेद असू शकतात, भूमिका वेगळ्या असू शकतात; परंतु जनतेच्या हितासाठी एकत्र येण्याची वृत्ती फार थोड्या नेत्यांमध्ये दिसते. जयंतराव पाटील हे त्यापैकी एक आहेत. त्यामुळेच आमचे नाते हे केवळ राजकीय सहप्रवासाचे नसून परस्पर आदर, विश्वास आणि सामाजिक बांधिलकीवर उभे असलेले एक जिव्हाळ्याचे नाते आहे.

जयंतभाई आता ७१व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. पण, मी म्हणेन, काबाडकष्ट करणाऱ्या शेतकरी, शेतमजूर आणि कामगारांसाठी त्यांनी १०० वी पार करावी, हीच माझी ईश्वराकडे प्रार्थना!

## सामान्यांच्या हितासाठी
# रस्त्यावर उतरणारे भाई!

**शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते भाई जयंत पाटील यांना ७१व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा! भाईंच्या आजपर्यंतच्या कारकीर्दीवर आधारित विशेषांकाचे प्रकाशन करण्यात येत आहे, हे निश्चितपणे आनंददायी आहे.**

कोकणच्या विकासाबरोबर शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सातत्याने त्यांनी आग्रही भूमिका मांडली आहे. शेतकरी कामगार पक्षाचे काम करत असताना त्यांनी अनेक जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत.

रायगड जिल्हा मध्यवर्ती बँक, महाराष्ट्र राज्य मजूर संघ, महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मच्छिमार संघ या माध्यमातून सहकार क्षेत्रात उल्लेखनीय काम केले आहे. या कामगिरीबद्दल २०११-२०१२ महाराष्ट्र शासनाचा ''सहकारनिष्ठ पुरस्कार'' व २०१२-२०१३ चा ''सहकार भूषण'' पुरस्कार देऊन त्यांना गौरविले आहे. सन २००० पासून प्रभाकर पाटील एज्युकेशन संस्था, अलिबाग या संस्थेचे अध्यक्षपद सांभाळतानासुद्धा त्यांनी चौफेर कार्य केले आहे. महाराष्ट्र विधान परिषदेमध्ये आमदार म्हणून त्यांनी आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटवला आहे. तसेच मी मंत्री असताना कामाबद्दलची त्यांची पोटतिडीक अनुभवली आहे. त्यामुळेच उत्कृष्ट संसदपटू म्हणूनसुद्धा त्यांचा गौरव झाला. विधानपरिषदेत सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात समन्वय साधायचे काम त्यांनी नेहमीच केले.



**आमदार सतेज उर्फ बंटी डी. पाटील**
**गटनेते (काँग्रेस), महाराष्ट्र विधान परिषद**
**माजी गृह राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**

कामकाजात एखादा अडचणीचा प्रसंग आला तर त्यावर मार्ग काढायचे कौशल्य त्यांच्याकडे होते. सामान्य माणूस, कामगार, शेतकरी तसेच शासनाची चुकीची धोरणे यावर ते अभ्यासपूर्ण मांडणी करत होते. सामान्य माणसाच्या हिताची भूमिका केंद्रस्थानी ठेवून सतत कार्यरत असणारे, रस्त्यावर उतरून संघर्ष करणारे भाई जयंत पाटील यांचा जीवनप्रवास प्रेरणादायी आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त मनापासून शुभेच्छा!

## भाईंचे नेतृत्व म्हणजे
# कार्यकर्त्यांचा विश्वास

शेतकरी कामगार पक्षाचे राज्य सरचिटणीस तथा माजी आमदार भाई जयंत पाटील यांना ७१ व्या वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा. गेली अनेक दशके शेतकरी, कामगार, कष्टकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला आहे. त्यांचे साधेपण, अभ्यासू नेतृत्व, वैचारिक निष्ठा आणि कार्यकर्त्यांप्रती असलेली आत्मीयता ही आम्हा सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. पक्षाचा विचार तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी आयुष्यभर अथक परिश्रम घेतले असून, आजही त्याच जोमाने ते कार्यरत आहेत.

सन १९९१-९२ पासून मला भाईंच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी मिळाली. सामान्य कार्यकर्ता म्हणून सुरुवात करून तालुका खजिनदार, राज्य मध्यवर्ती समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य आणि आज रायगड जिल्हा चिटणीस अशा विविध पदांवर काम करण्याची संधी त्यांनी विश्वासाने दिली. कार्यकर्त्यांवर विश्वास ठेवून त्यांना घडविण्याची आणि योग्य संधी देण्याची त्यांची कार्यपद्धती हीच त्यांच्या नेतृत्वाची खरी ताकद आहे.



रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला राज्यातील अग्रगण्य बँक म्हणून उभे करण्यात भाईंचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे बँकेने यावर्षी आठ हजार कोटी रुपयांच्या व्यवसायाचा टप्पा पार केला आहे. सहकार क्षेत्रात त्यांनी केलेले काम हे केवळ रायगडपुरते मर्यादित नसून, संपूर्ण राज्यासाठी आदर्शवत ठरले आहे. भाईंच्या नेतृत्वाखाली शेतकरी कामगार पक्षाने रायगड जिल्ह्यात अनेक वर्षे स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था आणि जनआंदोलनांच्या माध्यमातून भक्कम संघटन उभे केले. संघर्षाच्या काळातही त्यांनी कधीही कार्यकर्त्यांचा हात सोडला नाही. कार्यकर्त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, त्यांना धीर देणे आणि पक्षनिष्ठेला नेहमीच सन्मान देणे, ही त्यांची जमेची बाजू आहे.

आमचे कुटुंबप्रमुख, मार्गदर्शक आणि प्रेरणास्थान असलेल्या भाई जयंत पाटील यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो आणि त्यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी कामगार पक्ष पुन्हा नव्या जोमाने पुढे वाटचाल करत शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य जनतेच्या हक्कांसाठी अधिक बळकटपणे उभा राहो, हीच वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक सदिच्छा.

**सुरेश नामदेव खैरे**
**जिल्हा चिटणीस, शेकापक्ष, रायगड**

## विचारांशी निष्ठा आणि माणुसकीचा जिव्हाळा जपणारे
# नेतृत्व

**महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि सहकार चळवळीतील अभ्यासू, संयमी आणि तत्त्वनिष्ठ नेतृत्व म्हणून भाई जयंत पाटील यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस म्हणून त्यांनी अनेक दशकांपासून समाजहिताच्या प्रश्नांवर सातत्याने भूमिका घेत जनतेचा विश्वास संपादन केला आहे. त्यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा..! त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो आणि समाजहिताचे त्यांचे कार्य असेच अखंडपणे सुरू राहो, हीच सदिच्छा.**



**आ. सत्यजीत तांबे, महाराष्ट्र विधान परिषद**

जयंतभाईंचे सार्वजनिक जीवन हे मूल्याधिष्ठित राजकारणाचे उत्तम उदाहरण आहे. सत्तेच्या किंवा पदाच्या मोहापेक्षा विचार, तत्त्व आणि सामान्य माणसाच्या प्रश्नांना त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले. शेतकरी, कामगार, सहकार आणि ग्रामीण विकास या विषयांवरील त्यांचा सखोल अभ्यास आणि सातत्यपूर्ण भूमिका महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात महत्त्वाची राहिली आहे.

माझ्यासाठी जयंतभाई हे केवळ ज्येष्ठ नेते नाहीत, तर आमच्या कुटुंबाशी जिव्हाळ्याचे संबंध असलेले व्यक्तिमत्त्व आहेत. माझे वडील डॉ. सुधीर तांबे आणि जयंतभाई यांच्यात अनेक दशकांपासून परस्पर स्नेह, आदर आणि वैचारिक जिव्हाळ्याचे संबंध आहेत. विधान परिषदेचे सदस्य म्हणून कार्यरत असताना दोघांनीही अनेक लोकहिताच्या विषयांवर अभ्यासपूर्ण आणि विधायक भूमिका मांडल्या. सभागृहातील त्यांचा सुसंस्कृत संवाद आणि परस्पर सन्मानाचे नाते आजही तितक्याच आत्मीयतेने कायम आहे.

या स्नेहसंबंधांची परंपरा त्याही आधीच्या पिढीपासून सुरू आहे. आमच्या दोन्ही कुटुंबांमध्ये अनेक वर्षांपासून जपले गेलेले विश्वासाचे आणि आत्मीयतेचे नाते आजही कायम आहे. राजकारणात मतभेद असले तरी मनभेद नसावेत, सार्वजनिक जीवनात संवाद आणि परस्पर आदर कायम असावा, हा संस्कार अशा नात्यांतूनच आम्हाला लाभला आहे.

जयंतभाई यांचा साधेपणा, कार्यकर्त्यांशी असलेली आत्मीयता, प्रत्येक विषयाचा सखोल अभ्यास आणि कोणत्याही परिस्थितीत संयम न सोडण्याची वृत्ती नेहमीच प्रेरणादायी वाटली. ज्येष्ठत्वाचा मोठेपणा त्यांनी कधीही वागण्यात येऊ दिला नाही; उलट प्रत्येकाशी माणुसकीने वागण्याचा त्यांचा स्वभाव विशेष भावतो.

आजच्या वेगाने बदलणाऱ्या राजकारणात सुसंस्कृत संवाद आणि वैचारिक प्रामाणिकपणाची गरज अधिक आहे.

जयंतभाईंचे संपूर्ण सार्वजनिक जीवन हीच मूल्ये जपणारे आहे. त्यामुळेच सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते आणि समाजातील विविध घटकांमध्ये त्यांच्याविषयी आदराची भावना कायम आहे.

भाई जयंत पाटील यांना वाढदिवसानिमित्त पुन्हा एकदा मनःपूर्वक शुभेच्छा..! त्यांना उत्तम आरोग्य, निरामय दीर्घायुष्य लाभो आणि त्यांच्या अनुभवाचा व मार्गदर्शनाचा लाभ महाराष्ट्राला पुढील अनेक वर्षे मिळत राहो, हीच सदिच्छा.



























# मैत्र जीवाभावाचे

राजकारणात विचार वेगळे असले, पक्ष वेगळे असले तरी माणसं जोडण्याची कला फार थोड्या नेत्यांकडे असते. भाई जयंत पाटील हे त्यापैकी एक. महाराष्ट्रातील जवळपास सर्वच पक्षांतील नेते, मंत्री, आमदार, खासदार आणि कार्यकर्त्यांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. सभागृहात मुद्द्यांवर कठोर भूमिका घेणारे भाई, सभागृहाबाहेर मात्र स्नेह, संवाद आणि परस्पर आदराची परंपरा जपत. मतभेद असले तरी मनभेद नसावेत, हा त्यांचा स्वभाव आजही कायम आहे. म्हणूनच पक्षभेदाच्या पलीकडे जाऊन सर्वच राजकीय नेते भाईंचा आदर करतात.









# सहकारातील महामेरू

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन, महाराष्ट्र राज्य मजूर संघ, मच्छिमार सहकारी संघ अशा विविध संस्थांमध्ये नेतृत्व करत भाई जयंत पाटील यांनी सहकार क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने राज्यात आणि देशात मानाचे स्थान मिळवले. सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना महाराष्ट्र शासनाचा सहकारनिष्ठ पुरस्कार (२०११-१२) आणि सहकार भूषण पुरस्कार (२०१२-१३) प्रदान करण्यात आला. त्यामुळे भाई जयंत पाटील यांना सहकार क्षेत्रातील महामेरू म्हणून ओळखले जाते.







# कार्यकर्त्यांचा आधारवड

शेतकरी कामगार पक्षाचा सामान्य कार्यकर्ता हीच भाई जयंत पाटील यांची खरी ताकद आहे. कार्यकर्त्यांवर विश्वास ठेवणे, त्यांना संधी देणे, संकटात त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे आणि त्यांच्याशी जिव्हाळ्याचे नाते जपणे, ही त्यांच्या नेतृत्वाची खास ओळख आहे. त्यामुळेच आजही शेकापचा कार्यकर्ता भाईंना आपला नेता नव्हे, तर कुटुंबप्रमुख मानतो.



# शेतकरी - कष्टकऱ्यांच्या हक्काचा बुलंद आवाज





शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते, सरचिटणीस तथा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष भाई जयंत प्रभाकर पाटील हे महाराष्ट्राच्या राजकारणातील अभ्यासू, संयमी, दूरदृष्टीचे आणि शेतकरी-कष्टकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने लढणारे बुलंद नेतृत्व म्हणून ओळखले जातात. शेकापची पुरोगामी विचारधारा जपत त्यांनी तळागाळातील सर्वसामान्य माणसाच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला आहे. भाईंसोबत आमच्या कुटुंबाचे नाते अनेक दशकांपासून जिव्हाळ्याचे आहे. भाईंचे आजोबा आणि स्वर्गीय माणिक (आबा) जगताप यांचे वडील स्वर्गीय सखाराम जगताप यांच्यात अतिशय आत्मीय संबंध होते. कोकणातील गोरगरीब, शेतकरी आणि कष्टकरी समाजाच्या हितासाठी या दोन्ही ज्येष्ठांनी खांद्याला खांदा लावून काम केले. त्यातून निर्माण झालेला स्नेहाचा वारसा पुढे स्वर्गीय माणिक (आबा) जगताप आणि भाई जयंत पाटील यांनीही तितक्याच जिव्हाळ्याने जपला. ही मैत्री आणि समाजसेवेची परंपरा पुढील पिढीतही कायम राहील, याचा विश्वास वाटतो.



**स्नेहल माणिक जगताप,**
**माजी नगराध्यक्षा, महाड**

# भाई जयंत पाटील यांची कार्यपद्धती हीच शेकापची वैचारिक ताकद!



शेतकरी, कामगार, कष्टकरी आणि श्रमजीवी जनतेच्या हितासाठी राजकारण करणे, ही शेतकरी कामगार पक्षाची मूलभूत विचारधारा आहे. सत्तेपेक्षा विचार आणि जनहिताला प्राधान्य देत, प्रसंगी सत्तेसोबत, तर प्रसंगी सत्तेच्या विरोधात ठामपणे उभे राहण्याची परंपरा शेकापने जपली आहे. त्या परंपरेचे आजही अत्यंत सक्षमपणे नेतृत्व करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे भाई जयंत पाटील. भाईंची कार्यपद्धती ही संयम, अभ्यास, दूरदृष्टी आणि वैचारिक निष्ठा यांचा सुंदर मिलाफ आहे. बदलत्या राजकीय परिस्थितीतही त्यांनी शेकापची विचारधारा कधीच डळमळू दिली नाही. शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने संघर्ष केला आणि जनतेचा विश्वास संपादन केला.

आज झपाट्याने होणाऱ्या शहरीकरणाच्या प्रक्रियेत सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसत आहे. अशा काळात शेतकऱ्यांच्या मुलांनी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून स्वतःच्या जमिनींचा विकास स्वतः करावा, रोजगारनिर्माते व्हावे आणि उद्योजक बनावे, हा विचार भाईंनी नेहमीच पुढे ठेवला. त्यांच्या प्रेरणेतून समाजाला नवी दिशा देणारे उपक्रम राबविण्याची ऊर्जा आम्हाला मिळते.

याच प्रेरणेतून 'अतुल म्हात्रे ग्लोबल लर्निंग अँड रिसर्च सेंटर'च्या माध्यमातून ग्रामीण भागातील युवकांसाठी अत्याधुनिक प्रशिक्षण उपक्रम सुरू करण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या मुलांना बांधकाम क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, विकास नियोजन, प्रकल्प व्यवस्थापन आणि स्वावलंबनाचे धडे देऊन त्यांना नवे भविष्य घडविण्याचा प्रयत्न केला जात आहे. हा उपक्रम म्हणजे भाईंच्या विचारांना प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याचा एक छोटासा प्रयत्न आहे. आजच्या राजकारणात विचारांपेक्षा सत्तेची स्पर्धा अधिक दिसून येते. पक्षांतर, फोडाफोडी आणि स्वार्थी राजकारणामुळे युवकांमध्ये राजकारणाबद्दल संभ्रम निर्माण होत आहे. अशा वेळी शेकापसारख्या वैचारिक पक्षाची आणि भाई जयंत पाटील यांच्यासारख्या तत्त्वनिष्ठ नेतृत्वाची गरज अधिक प्रकर्षाने जाणवते.

भाई जयंत पाटील यांचा वाढदिवस हा केवळ शुभेच्छांचा दिवस नाही, तर त्यांच्या विचारांप्रती आणि कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. त्यांना उत्तम आरोग्य, निरोगी दीर्घायुष्य लाभो आणि शेतकरी, कामगार, कष्टकरी तसेच सर्वसामान्य जनतेसाठी त्यांचे नेतृत्व असेच मार्गदर्शक ठरो, हीच सदिच्छा.

**अतुल म्हात्रे, खजिनदार,**
**शेतकरी कामगार पक्ष**

भाईंना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा! लाल सलाम!

**शब्दांकन : सुधाकर लाड.**
**ज्येष्ठ पत्रकार/इतिहास संशोधक, भ्रमणध्वनी - ९२२४२३२९६३**

---

शेकापचे प्रमुख आधारस्तंभ म्हणून भाई जयंत पाटील यांनी पक्षाची विचारधारा अधिक सक्षमपणे जनतेपर्यंत पोहोचवली. शेतकरी, कामगार, कष्टकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना त्यांनी सातत्याने वाचा फोडली. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाच्या माध्यमातून सहकार क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य आज राज्यासाठी आदर्श मानले जाते.

महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी सभागृहात शेतकरी, कामगार, सहकार आणि ग्रामीण विकासाशी संबंधित प्रश्न अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडले. त्यांची भाषणशैली आक्रमक असली तरी संयमी आणि तथ्याधारित असल्याने विरोधकांनाही त्यांचा अभ्यास मान्य करावा लागतो. त्यामुळेच राज्याच्या राजकारणात त्यांनी स्वतंत्र आणि प्रभावी स्थान निर्माण केले आहे. सहकार चळवळीचा गाढा अभ्यास असलेल्या भाईंनी ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी आणि सहकार क्षेत्रात पारदर्शकता वाढविण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. शेतकरी आणि कामगारांच्या आर्थिक उन्नतीसाठी त्यांनी केलेले कार्य नेहमीच प्रेरणादायी राहिले आहे. शेकापच्या समाजवादी आणि पुरोगामी विचारधारेचा वारसा समर्थपणे पुढे नेत त्यांनी रायगडसह संपूर्ण कोकणात पक्षाची ताकद टिकवून ठेवली. कामगारांच्या हक्कासाठी रस्त्यावरचा संघर्ष असो किंवा सभागृहातील लढा, भाई नेहमीच अग्रस्थानी राहिले आहेत.

रायगड जिल्ह्यात शेकापची पाळेमुळे आजही भक्कम राहण्यामागे भाई जयंत पाटील यांचे नेतृत्व मोठे कारण मानले जाते. त्यांचे वडील स्वर्गीय प्रभाकर पाटील आणि आई सुलभाताई पाटील यांनी दिलेल्या संस्कारांचा ठसा त्यांच्या सार्वजनिक जीवनावर स्पष्टपणे उमटलेला दिसतो. अलिबाग पंचायत समिती सदस्य म्हणून सुरू झालेला त्यांचा राजकीय प्रवास रायगड जिल्हा परिषद सदस्य आणि त्यानंतर सन २००० ते २०२४ या कालावधीत सलग विधान परिषदेचे सदस्य म्हणून उल्लेखनीय ठरला.रायगड जिल्ह्यातील सहकार, ग्रामविकास आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्यांचे नेतृत्व प्रभावी राहिले आहे. त्यांच्या नेतृत्वाखालील रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने राष्ट्रीय स्तरावर विशेष मानांकन मिळवून जिल्ह्याचा गौरव वाढविला आहे. राजकारण आणि सहकाराबरोबरच उद्योग क्षेत्रातही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. नागेश एंटरप्रायजेस, नागेश पब्लिशर्स प्रा.लि., पीएनपी मेरिटाईम सर्व्हिसेस प्रा. लि. तसेच सीस्प्रे ॲल्युमिनियम बोट्स (इंडिया) प्रा. लि. या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपन्यांच्या माध्यमातून त्यांनी रोजगारनिर्मिती आणि औद्योगिक विकासालाही चालना दिली आहे.

महाराष्ट्र विधान परिषदेत शेकापची भूमिका प्रभावीपणे मांडणारे, सहकार क्षेत्राला नवी दिशा देणारे, शेतकरी-कष्टकरी वर्गाचे खंबीर नेतृत्व करणारे आणि समाजकारणाला आयुष्य वाहणारे भाई जयंत पाटील यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो आणि त्यांचे समाजहिताचे कार्य अशीच अविरतपणे सुरू राहो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.


# सहकार, समाजकारण आणि शिक्षण चळवळीचे आधारस्तंभ

माजी आमदार, शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आणि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष भाई जयंत पाटील हे रायगडच्या राजकीय, सामाजिक आणि सहकार क्षेत्रातील अत्यंत प्रभावी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. 'भाई' या नावाने सर्वपरिचित असलेले जयंत पाटील हे तत्त्वनिष्ठ, स्पष्ट वक्ते आणि आपल्या विचारांशी कधीही तडजोड न करणारे नेतृत्व म्हणून जनमानसात आदराचे स्थान मिळवून आहेत. अनेक राजकीय संकटे, विरोध आणि कठीण प्रसंगांचा सामना करतानाही त्यांनी आपल्या विचारसरणीपासून कधीही माघार घेतली नाही. गेल्या चार दशकांहून अधिक काळ त्यांनी शेकापच्या लाल बावट्याखाली शेतकरी, कष्टकरी, मच्छिमार, कामगार आणि सर्वसामान्य जनतेच्या हक्कासाठी सातत्याने संघर्ष केला आहे.

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळताना त्यांनी सहकार क्षेत्राला नवी दिशा दिली. त्यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा बँकेने केवळ राज्यातच नव्हे, तर देशपातळीवरही आदर्शवत वाटचाल केली आहे. 'मिशन २०२८' अंतर्गत एक हजार कोटी रुपयांचा स्वनिधी आणि दहा हजार कोटी रुपयांचा व्यवसाय हे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट त्यांनी ठेवले आहे. सहकाराचा मूळ उद्देश शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण हा मानून पीककर्ज, मत्स्यव्यवसायासाठी कर्ज, महिला बचतगटांना अर्थसहाय्य आणि ग्रामीण भागात बँकिंग सेवा पोहोचविण्यावर त्यांनी विशेष भर दिला. भात, नारळ, सुपारी उत्पादकांना वेळेवर कर्जपुरवठा करून जिल्ह्याच्या कृषी अर्थव्यवस्थेला त्यांनी बळकटी दिली. त्यांच्या पुढाकारातून अनेक सहकारी संस्था उभ्या राहिल्या. सहकार क्षेत्रातील त्यांचे योगदान आणि नेतृत्व त्यांच्या राजकीय विरोधकांनाही मान्य करावे लागते. मोठी स्वप्ने पाहणे आणि ती प्रत्यक्षात उतरविणे हा जणू त्यांच्या कार्यशैलीचाच अविभाज्य भाग आहे.

सामाजिक क्षेत्रातही त्यांनी शेकापच्या विचारसरणीला केंद्रस्थानी ठेवत शेतकरी, भूमीहीन मजूर, मच्छिमार आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पुन्हा जिल्हा परिषदेसह विविध संस्थांवर लाल बावटा फडकविण्याचे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले. अपयशाने खचून न जाता नव्या जोमाने बूथस्तरापर्यंत संघटन उभी करण्याचा संदेश त्यांनी दिला. ''गद्दारांना शून्य बनविण्याची ताकद कार्यकर्त्यांमध्ये आहे,'' असा विश्वास व्यक्त करत त्यांनी कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण केले. तरुणांना संघटनेत मोठ्या प्रमाणावर संधी देणे, राजकारणातील नैतिकता जपणे आणि तत्त्वांवर आधारित राजकारणाची परंपरा कायम ठेवणे, हा त्यांच्या कार्याचा गाभा राहिला आहे. सत्ता हे अंतिमध्येय नसून, गरीब, शेतकरी, महिला आणि असंघटित कामगारांना न्याय मिळवून देणे, हेच राजकारणाचे खरे उद्दिष्ट असल्याची त्यांची ठाम भूमिका आहे.





प्रदीप नाईक, अध्यक्ष, महाराष्ट्र कामगार आघाडी, शेकाप

शैक्षणिक क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. रायगड जिल्ह्यातील ग्रामीण आणि आदिवासी विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, या उद्देशाने त्यांनी शेकाप पुरस्कृत शिक्षण संस्थांना सातत्याने पाठबळ दिले. अलिबाग, पेण तसेच दक्षिण रायगड भागात शाळा आणि महाविद्यालयांच्या उभारणीसाठी सहकाराच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून दिला. स्वतःच्या उत्पन्नातील ठरावीक हिस्सा ते सामाजिक आणि शैक्षणिक कार्यासाठी खर्च करतात, ही त्यांची विशेष जमेची बाजू आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये युवक आणि महिलांना संधी देण्याचे धोरण त्यांनी सातत्याने अवलंबिले. अलिबाग नगराध्यक्षपदासाठी अक्षया प्रशांत नाईक यांची उमेदवारी जाहीर करून त्यांनी युवा महिला नेतृत्वाला प्रोत्साहन दिले. जिल्हा बँकेच्या माध्यमातून कौशल्य विकास, संगणक प्रशिक्षण, शेतीपूरक व्यवसाय आणि मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन करून हजारो युवकांसाठी स्वयंरोजगाराची दारे खुली केली. बँकेच्या कारभारात राजकीय विचार बाजूला ठेवून विरोधकांनाही मदतीचा हात देण्याचा व्यावसायिक आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन त्यांनी कायम ठेवला. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांतील नेत्यांशी त्यांचे स्नेहपूर्ण संबंध आहेत आणि सत्तेत नसतानाही अनेकांची कामे ते सातत्याने मार्गी लावत असतात. भाई जयंत पाटील यांचे संपूर्ण जीवन म्हणजे सहकार, समाजकारण आणि शिक्षण या त्रीसूत्रीचा प्रेरणादायी संगम आहे. आमदार म्हणून विधानपरिषदेत त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न प्रभावीपणे मांडले, तर जिल्हा बँकेचे अध्यक्ष म्हणून सहकारातून आर्थिक सक्षमीकरणाची नवी वाट निर्माण केली. विरोधकांवर टीका करतानाही त्यांनी वैचारिक पातळी कधीही सोडली नाही. रायगडच्या मातीत घट्ट रुजलेला हा नेता आजही लाल बावटा खांद्यावर घेऊन समता, न्याय आणि तत्त्वनिष्ठ राजकारणासाठी लढत आहे. वडील प्रभाकर पाटील यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत त्यांनी रायगडच्या सहकार चळवळीला आधुनिकतेची जोड दिली आणि पुढील पिढीसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला.

आजच्या सत्ताकेंद्रित राजकारणात त्यांच्या काही भूमिका अनेकांना कठीण वाटतात. सत्तेसाठी तडजोडी करणाऱ्या राजकीय वातावरणातही त्यांनी तत्त्वांशी तडजोड करण्यास स्पष्ट नकार दिला आहे. सत्ता सर्वस्व नसून, तत्त्वे अधिक महत्त्वाची आहेत, हा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून सातत्याने दिला आहे. प्रसंगी स्वकीयांविरुद्ध भूमिका घ्यावी लागली, तरी त्यांनी विचारांशी बेईमानी केली नाही. त्यांचा ठाम विश्वास आहे की, एक दिवस परिस्थिती बदलेल, लोकांना सत्याची जाणीव होईल आणि तत्त्वनिष्ठ राजकारण पुन्हा विजयी होईल. आज ते अशक्य वाटत असले, तरी उद्याच्या परिवर्तनाचा तोच पाया ठरेल, अशी ऊर्जा आणि विश्वास ते आपल्या कार्यकर्त्यांना देत असतात. तत्त्वनिष्ठ राजकारणाचे, सहकार चळवळीचे आणि सामाजिक बांधिलकीचे आधारस्तंभ असलेल्या भाई जयंत पाटील यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!



# विचारांचा वारसा समर्थपणे पुढे नेणारे भाई जयंत पाटील

शेतकरी, कष्टकरी आणि कामगारांच्या हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष करणारे शेतकरी कामगार पक्षाचे संस्थापक आप्पासाहेब नारायण नागूजी पाटील यांचा विचारांचा वारसा समर्थपणे पुढे नेणारे नेतृत्व म्हणजे भाई जयंत पाटील. आप्पासाहेबांचे नातू आणि रायगडचे भाग्यविधाते स्व. प्रभाकर पाटील यांचे सुपुत्र असलेले भाई जयंत पाटील यांचा वाढदिवस हा केवळ शुभेच्छा देण्याचा दिवस नसून, शेतकरी कामगार पक्षाला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे.

आज महाराष्ट्रातील राजकारण झपाट्याने बदलत आहे. विचारांपेक्षा सत्तेचे राजकारण आणि पक्षांतराची संस्कृती वाढत असताना, शेतकरी कामगार पक्षासारख्या वैचारिक पक्षालाही त्याची झळ बसली आहे. मात्र, अशा कठीण काळातही कार्यकर्त्यांवर विश्वास ठेवणारे, विचारांशी तडजोड न करणारे आणि संघटना टिकवून ठेवणारे नेतृत्व भाई जयंत पाटील यांनी दिले आहे. त्यांची शांत, संयमी आणि अभ्यासू कार्यशैली हीच पक्षाची सर्वात मोठी ताकद आहे.



अनिल ढवळे, आदर्श सरपंच तथा अध्यक्ष, रायगड जिल्हा शेतकरी सभा

भाई जयंत पाटील यांनी अनेक वर्षे विधान परिषदेवर शेतकरी कामगार पक्षाचे प्रतिनिधित्व कायम ठेवले. हा केवळ राजकीय यशाचा विषय नसून, कार्यकर्त्यांवरील विश्वास, संघटनशक्ती आणि वैचारिक राजकारणाचा विजय आहे. आजही राज्यातील विविध आघाड्यांमध्ये शेकापचा विचार प्रभावीपणे मांडण्याची क्षमता भाईंमध्ये आहे.

रायगड जिल्ह्यात आज जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पक्षाचे प्रतिनिधित्व पूर्वीइतके नसले, तरी शेकापच्या विचारांवर विश्वास ठेवणारा कार्यकर्ता आजही तितक्याच निष्ठेने उभा आहे. आगामी ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये भाई जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी कामगार पक्ष पुन्हा रायगडमध्ये पहिल्या क्रमांकाचा पक्ष म्हणून उदयास येईल, असा ठाम विश्वास आहे.

इतिहास साक्षी आहे की, प्रत्येक वेळी संकटे आली, पराभव झाले, आव्हाने उभी राहिली; पण शेतकरी कामगार पक्षाने फिनिक्स पक्ष्याप्रमाणे राखेतून पुन्हा भरारी घेतली. याही वेळी भाई जयंत पाटील यांच्या नेतृत्वात शेकाप नव्या जोमाने उभारी घेईल, याबद्दल कोणतीही शंका नाही.

माजी आमदार बाळाराम पाटील, काशिनाथ पाटील, नारायणशेठ घरत यांच्यासह अनेक ज्येष्ठ नेते आणि हजारो कार्यकर्ते भाईंच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून पक्षसंघटना अधिक बळकट करण्यासाठी काम करत आहेत. हा विश्वासच शेकापची खरी ताकद आहे.

रायगड हा शेतकरी कामगार पक्षाचा बालेकिल्ला म्हणून महाराष्ट्रात ओळखला जातो. ही ओळख अधिक भक्कम करण्याचे सामर्थ्य भाई जयंत पाटील यांच्या नेतृत्वात आहे. पक्षाच्या वैचारिक परंपरेला आधुनिक काळाची जोड देत ते शेकापला नव्या उंचीवर घेऊन जातील, असा विश्वास प्रत्येक कार्यकर्त्याच्या मनात आहे.

भाई जयंत पाटील यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो, हीच सदिच्छा.




# सात दशकांचा जनसंघर्ष

व्यक्तीचे आयुष्य वर्षांनी मोजले जाते; परंतु नेतृत्वाचा इतिहास त्याच्या कार्याने, विचारांनी आणि समाजावर उमटवलेल्या ठशाने लिहिला जातो. काही माणसे केवळ राजकारण करतात, काही सत्ता उपभोगतात, तर काही काळाच्या प्रवाहात समाजाचे विचारविश्व समृद्ध करत इतिहासाचा भाग बनतात. भाई जयंत पाटील हे अशाच नेतृत्वाचे नाव आहे.

७१ वर्षांचा त्यांचा जीवनप्रवास हा केवळ एका राजकारण्याचा प्रवास नाही; तो रायगडच्या राजकीय, सामाजिक, सहकार, शैक्षणिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचा साक्षीदार आहे. चार पिढ्यांच्या बदलत्या राजकीय समीकरणांमध्ये, संघर्षांमध्ये आणि विकासाच्या विविध टप्प्यांमध्ये त्यांनी केवळ स्वतःचे अस्तित्व टिकवले नाही, तर आपल्या वैचारिक भूमिकेची सातत्याने जपणूक केली. म्हणूनच आजही त्यांच्याकडे केवळ एका पक्षाच्या नेत्याच्या नजरेतून पाहिले जात नाही; तर विचारांशी प्रामाणिक राहिलेल्या लोकनेत्याच्या रूपात त्यांचा गौरव केला जातो.

शेतकरी कामगार पक्ष हा महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासातील एक वेगळा अध्याय आहे. या पक्षाने सत्तेपेक्षा विचारांना, पदापेक्षा चळवळीला आणि व्यक्तिपूजेपेक्षा लोकसहभागाला महत्त्व दिले. भाई जयंत पाटील यांनी ही परंपरा केवळ जपली नाही, तर बदलत्या काळातही ती जिवंत ठेवली. राजकीय परिस्थिती कितीही बदलली, आघाड्या बदलल्या, सत्तेची समीकरणे बदलली; तरी शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांवरील त्यांची भूमिका कायम राहिली.

आज भारतीय राजकारणात विचारांपेक्षा व्यक्ती, तत्त्वांपेक्षा सत्ता आणि जनहितापेक्षा निवडणुकीचे गणित अधिक महत्त्वाचे ठरत असल्याचे चित्र अनेकदा दिसते. अशा काळात आपल्या भूमिकेशी तडजोड न करणारे भाईंसारखे नेतृत्व दुर्मिळ झाले आहे. भाई जयंत पाटील यांचे वैशिष्ट्य म्हणजे, त्यांनी कधीही राजकारणाला केवळ सत्तेचे साधन मानले नाही. त्यांच्यासाठी राजकारण म्हणजे समाजपरिवर्तनाचे माध्यम, दुर्बलांच्या हक्कांसाठी लढण्याचे व्यासपीठ आणि लोकशाही मूल्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी होती. त्यांच्या जडणघडणीमागे एक समृद्ध वैचारिक परंपरा आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या संघर्षशील विचारधारेत वाढलेले भाई स्वर्गीय ना.ना. पाटील, ॲड. दत्ता पाटील आणि स्व. प्रभाकर नारायण पाटील यांच्या सामाजिक व राजकीय वारशाचे सक्षम वारसदार ठरले. हा वारसा केवळ कौटुंबिक नव्हता; तो शोषित, वंचित, शेतकरी, कष्टकरी आणि श्रमिकांच्या बाजूने ठाम उभे राहण्याचा होता. हीच भूमिका त्यांनी आजपर्यंत जपली.



माधवी सावंत,
संपादक, दैनिक कृषीवल

रायगडच्या भूमीत अनेक नेते झाले, अनेकांनी मोठमोठी पदे भूषविली; काळाच्या कसोटीवर टिकून राहण्यासाठी विचार, पक्ष बदलले. पण, विचारांशी तडजोड न करणारे भाई जयंत पाटील हे एकमेव नाव घ्यावे लागेल. भाई जयंत पाटील यांनी आपल्या कार्यातूनही जनतेच्या विश्वासाची, आपुलकीची संपत्ती कमावली. जनतेशी संवाद, कार्यकर्त्यांशी आत्मीयता, विरोधकांशी सुसंवाद आणि समाजातील प्रत्येक घटकाशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध ही त्यांच्या नेतृत्वाची खरी ताकद आहे. म्हणूनच रायगडच्या राजकीय इतिहासाचा उल्लेख भाईंशिवाय पूर्ण होऊ शकत नाही.

भाईंच्या व्यक्तिमत्त्वाकडे पाहताना केवळ राजकीय कारकीर्द दिसत नाही; त्यामागे सहकार चळवळीला दिलेली चालना, शिक्षणाच्या प्रसारासाठी केलेले प्रयत्न, सामाजिक सलोखा जपण्याची भूमिका आणि नव्या पिढीला विचारांची दिशा देण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्नही तितकाच ठळकपणे दिसून येतो. त्यांनी जपलेला वारसा हा व्यक्तिपूजेचा नसून विचारांचा आहे; सत्तेचा नसून समाजकारणाचा आहे; आणि पदाचा नसून जनविश्वासाचा आहे. रायगड जिल्ह्याचा इतिहास पाहिला, तर विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर लोकचळवळींचा प्रभाव दिसून येतो. जमीन, पाणी, शिक्षण, रोजगार, सहकार, मत्स्यव्यवसाय, औद्योगिकीकरण, पर्यावरण आणि स्थानिकांच्या हक्कांसाठी अनेक संघर्ष झाले. या संघर्षांमध्ये भाई जयंत पाटील यांची उपस्थिती केवळ राजकीय नव्हती; ती नेतृत्व करणाऱ्या, दिशा देणाऱ्या आणि लोकांना संघटित करणाऱ्या व्यक्तिमत्त्वाची होती. शासनाला प्रश्न विचारणे, चुकीच्या धोरणांना विरोध करणे आणि योग्य निर्णयांसाठी सातत्याने पाठपुरावा करणे, हे त्यांच्या राजकीय शैलीचे वैशिष्ट्य राहिले.

सहकार क्षेत्रातील त्यांचे योगदानही तितकेच उल्लेखनीय आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या सहकाराला आधुनिक व्यवस्थापनाची जोड देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून सहकार क्षेत्राला नवी दिशा देण्याचे काम त्यांनी केले. आणि म्हणूनच आज केवळ राज्यातच नाही, तर सातासमुद्रापार रायगड जिल्हा बँकेचे नाव सन्मानाने घेतलं जातं. आज या बँकेने ८ हजार कोटींचा टप्पा पार केलाय.

शिक्षण क्षेत्रात पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याचे काम त्यांनी केले. कारण, समाजाचा विकास केवळ रस्ते, पूल आणि इमारतींनी होत नाही; तो शिक्षण, विचार आणि सक्षम तरुण पिढी घडविण्याने होतो, याची त्यांना पूर्ण जाणीव होती. महाविकास आघाडीच्या स्थापनेतही पुरोगामी शक्तींना एकत्र आणण्याची गरज त्यांनी सातत्याने मांडली. लोकशाही, संविधान, सामाजिक न्याय आणि धर्मनिरपेक्ष मूल्यांचे संरक्षण करण्यासाठी व्यापक वैचारिक एकजूट आवश्यक असल्याची त्यांची भूमिका स्पष्ट होती. त्यामुळे ते केवळ एका पक्षाचे नेते न राहता पुरोगामी राजकारणातील समन्वयक म्हणूनही ओळखले जातात.

७१ वर्षांचा हा प्रवास अनेक चढ-उतारांनी भरलेला आहे. जय-पराभव, सत्ता-विरोध, संघर्ष-सन्मान अशा प्रत्येक टप्प्यावर त्यांनी संयम, अभ्यास आणि जनतेवरील विश्वास कायम ठेवला. याच कारणामुळे रायगडच्या जनतेच्या मनात त्यांच्याबद्दल आदराची भावना आजही कायम आहे. ७१ व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या आतापर्यंतच्या कार्याला कृतज्ञ अभिवादन! त्यांच्या नेतृत्वातून पुरोगामी विचारांचा दीप असाच तेजोमय राहो आणि समाजहिताची ही अखंड वाटचाल अधिक बळकट होत राहो, हीच सदिच्छा.

# अन्यायाविरुध्दची बुलंद हाक

**साधारणतः ही घटना २०१६ ची आहे. हिंगोली जिल्ह्यातील खानापूर (चित्ता) येथील श्री गजानन शिक्षण प्रसारक मंडळाच्या चार शासन अनुदानित शाळांभोवती मोठे संकट निर्माण झाले होते. या संस्थाअंतर्गत व्यवस्थापनामध्ये काही वाद होता. त्या वादाचा फायदा घेऊन तत्कालीन शिक्षणाधिकारी दीपक चवणे यांनी या शाळांची सुपारी घेतली होती. त्यामध्ये या संस्थेतील चार शाळेचे डिस्ट्रीब्यूशन कशा पद्धतीने करायचं, हे पण ठरवलं होतं. त्या अनुषंगाने त्याने एक रणनीती अवलंबली होती. सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांना बडतर्फ करणे आणि आपल्या सोयीचे शिक्षक कर्मचाऱ्यांना मुख्याध्यापकपदी नेमून या चारही शाळांची विल्हेवाट लावण्याचे ते षड्यंत्र होते. शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा सरचिटणीस भाई जयंत पाटील यांच्या वैचारिक शब्दांनी हे षड्यंत्र कसं उधळून लावलं, त्याची ही कहाणी आहे.**



आज मी ५८ वर्षांचा आहे. माझी कौटुंबिक पार्श्वभूमी हैदराबाद मुक्तिसंग्राम आणि सत्यशोधक समाजाच्या विचारधारेशी घट्टपणे जोडलेली आहे. माझे वडील अण्णासाहेब टाकळगव्हाणकर हे हैदराबाद मुक्तिसंग्रामातील अग्रगण्य स्वातंत्र्यसैनिक होते. ते सत्यशोधक विचारांचे निष्ठावंत अनुयायी होते आणि त्यांच्या पुरोगामी विचारांतूनच माझी जडणघडण झाली. शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात मला शेतकरी कामगार पक्ष आणि डाव्या चळवळीच्या विचारांचा मोठा प्रभाव लाभला. भाई उद्धव पाटील, केशवराव धोंडगे, अण्णासाहेब गव्हाणे यांसारख्या नेत्यांच्या विचारांनी माझ्या सामाजिक आणि राजकीय जाणिवा समृद्ध केल्या. त्या विचारांचा प्रभाव आजही माझ्या जीवनात कायम आहे. मला विशेष अभिमान वाटतो तो नवी मुंबईतील शेतकरी कामगार पक्षाच्या नेतृत्वाचा. त्या काळातील पक्षाची जनाधार असलेली कार्यपद्धती, शेतकरी-कष्टकरी वर्गाशी असलेली बांधिलकी आणि संघर्षशील भूमिका माझ्यासाठी प्रेरणादायी ठरली. या नेतृत्वात विशेष उल्लेख करावासा वाटतो तो शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते व सरचिटणीस भाई जयंत पाटील यांचा. त्यांच्या वैचारिक स्पष्टतेने, संघटन कौशल्याने आणि सामान्य माणसाच्या प्रश्नांप्रती असलेल्या बांधिलकीने माझ्यावर खोल प्रभाव टाकला आहे.



संजय टाकळगव्हाणकर

महात्मा फुले शिक्षण परिषदेचे अध्यक्ष व्यंकटराव जाधव यांनी एक दिवशी मला एक निरोप पाठवला. ''सर मी बाहेरगावी आहे, भाई जयंत पाटील हिंगोलीला येणार आहेत. त्यांच्या व्यवस्थेत वेळ द्या.'' भाईंचा मराठवाड्यांचा तो दौरा हा दुष्काळग्रस्तांना न्याय देण्याच्या अनुषंगाने होता. शासकीय विश्रामगृहात भाईंची आणि माझी पहिली प्रत्यक्ष भेट झाली. माझ्यासमवेत ज्येष्ठ पत्रकार रावण धाबे व रमेश वाबळे तसेच माझ्या शाळेतील सहकारी मित्र सतीश तायडे होते. भाईंची आणि माझी वैचारिक समानता ही अगोदरच होती. परंतु, आमच्या दहा मिनिटांच्या चर्चेत ती अधिक दृढ झाली. त्यावेळी आताचे छत्रपती संभाजीनगर व पूर्वीचे औरंगाबाद येथील विभागीय आयुक्त कार्यालयावर दुष्काळाच्या अनुषंगाने शेतकरी आणि कामगारांच्या प्रश्नावर भव्य असा मोर्चा काढण्यात आला. त्यामध्ये आमच्या संस्थेतील शिक्षक व परिसरातील शेतकऱ्यांना आणि कष्टकऱ्यांना या मोर्चात आम्ही सहभागी करून घेतलं होतं. २०१६ मध्ये मी वर उल्लेख केलेला शिक्षणाधिकारी हा आमचा कर्दनकाळ ठरला होता. अशा परिस्थितीमध्ये कोणाकडे जावं? कारण, अधिकाऱ्यांची मंत्रालयापर्यंत भारी लिंक होती. ती भेदणार कोण? हा माझ्याकडे यक्ष प्रश्न होता. त्यावेळेस, मला आठवले ते भाई जयंत पाटील. मी माझी अडचण आमचे परममित्र, महात्मा फुले शिक्षण परिषदेचे संस्थापक व्यंकटराव जाधवच्या कानावर घातली. त्यांनी लागलीच जयंतभाईंना या प्रश्नाचं गांभीर्य सांगितलं. नंतर भाईंची आणि माझी प्रत्यक्ष भेट अलिबाग येथे झाली. मी त्यांना हा प्रश्न समजावून सांगितला. त्यांना याचं गांभीर्य कळलं. त्यानंतर त्यांनी मला मुंबईला बोलवलं. मी आणि व्यंकटराव जाधव यांनी प्रत्यक्ष त्यांची भेट घेतली. आमच्या या प्रकरणांमध्ये मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शिक्षण उपसंचालक यांनी निर्णय घ्यावा, असे आदेश पारित झाले होते. भाईंना अधिकाऱ्यांच्या लॉबीच्या अनुषंगाने मी अगोदरच सांगितलं होतं. त्यांनी मला निश्चिंत राहा असं सांगितलं. ज्यावेळेस भाईंना आम्ही मुंबईला भेटायला गेलो होतो, त्यावेळेस त्यांनी तत्कालिन शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्याशी फोनवर त्यांची वेळ मागून घेतली होती. त्यांनी वेळही दिला होता. परंतु, आम्हालाच विलंब झाल्यामुळे माननीय शिक्षणमंत्री हे मुंबई विद्यापीठाच्या एका कार्यक्रमाला गेले होते. त्यावेळेस विधिमंडळाचे अधिवेशन चालू होतं. आमच्या सुनावणीची तारीखही एका दिवसावर आली होती. त्यामुळे भाई जयंत पाटील यांनी मला सल्ला दिला आणि सुनावणीच्या अनुषंगाने औरंगाबादला पाठवले. तर, व्यंकटराव जाधव यांना थांबण्याचा सल्ला दिला. विधिमंडळाच्या सभागृहामध्ये व्यंकटराव जाधवांना घेऊन जाण्याची जबाबदारी त्यांचे खासगी स्वीय सहाय्यक मंदार यांच्याकडे देण्यात आली. दुसऱ्या दिवशी स्वतः शिक्षणमंत्री विनोदी तावडे हे विधिमंडळाच्या शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यालयात आले. त्यांनी भाई जयंत पाटील यांना विचारलं, ''तुमचा प्रश्न काय आहे?'' भाईंनी सांगितलं, ''तुमचे अधिकारी इतके भ्रष्ट आहेत की, ते कोणालाही जुमानत नाहीत. त्यांना कायद्याचे ज्ञान नाही, फक्त त्यांना पैसा हवा आहे.'' तावडे साहेबांनी विचारले, ''भाई, बोला ते कोण अधिकारी आहेत?'' त्यावर भाईंनी संपूर्ण विषय त्यांना सांगितला. त्यावर शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी सांगितलं, ''भाई, एवढाच प्रश्न आहे का?'' भाईंनी होय असे उत्तर दिले.

शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी लागलीच शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद आताचे छत्रपती संभाजीनगर यांना फोन केला. ''श्री. गजानन शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुनावणीच्या अनुषंगाने शिक्षक कर्मचाऱ्यांवर अन्याय होणार नाही, याची खबरदारी घ्या आणि कायद्याने जर ते जमत नसेल, तर संपूर्ण फाईल घेऊन माझ्याकडे या. त्या भ्रष्ट अधिकाऱ्याला अभय देऊ नका. अन्यथा गाठ माझ्याशी आहे,'' असे ठणकावले. हे बोलून शिक्षणमंत्री विनोद तावडे भाईंचा निरोप घेताना म्हणाले की, ''भाई, एवढ्या लहान-सहान मुद्द्यांसाठी मला फोन जरी केला असता, तरी मी काम केले असते.''

शिक्षणमंत्र्यांच्या या एका फोनमुळे आम्हाला न्याय मिळाला. शिक्षणाधिकारी दीपक चवने यांनी आमची अशी वाट लावली होती की, आमच्या शाळेतील मुख्याध्यापकाची जी बडतर्फी होती, ती अत्यंत चुकीच्या पद्धतीने होती. परंतु, ज्या वेळेस अशा निलंबन किंवा बडतर्फीला शिक्षणाधिकारी मान्यता देतो, त्यावेळेस या बडतर्फीस फक्त शाळा न्यायाधिकरण हा एकमेव पर्याय असतो.

भाईंच्या शब्दामुळे शिक्षणमंत्र्यांनी शिक्षण उपसंचालकांना जे सुनावले होते, त्यामुळे बडतर्फीची कारवाई ही शिक्षण उपसंचालकाच्या आदेशानुसार रद्द झाली. महाराष्ट्र खासगी सेवाशर्ती अधिनियमाच्या कायद्याच्या अनुषंगाने ही पहिलीच घटना असेल. आमच्या संस्थेतील मुख्याध्यापकांच्या बडतर्फीचा आणि निलंबनाचा हा प्रश्न केवळ वैयक्तिक नव्हता, तर त्या अनुषंगानेच शिक्षणसंस्था व शाळा बळकवण्याचे एक षड्यंत्र होतं. ते षड्यंत्र भाई जयंत पाटील यांच्या कर्तव्यदक्षपणामुळे धुळीस मिळाले.

आज शिक्षणसंस्थेतील चारही शाळांमधील ५० ते ५५ शिक्षक, कर्मचारी फक्त भाईंच्या आशीर्वादामुळे आपलं शैक्षणिक कार्य व आपलं कुटुंब अत्यंत सुखमय आणि आनंदी जीवन जगत आहेत.

सांगण्याचा मुद्दा एवढाच की, केवळ आमदार किंवा मंत्रीपदावर असणे म्हणजे प्रभावी लोकप्रतिनिधित्व नव्हे. खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधी तोच, जो अन्यायग्रस्तांची वेदना समजून घेतो, त्यांची बाजू निडरपणे आणि सक्षमपणे मांडतो आणि सत्तेपेक्षा न्यायाला अधिक महत्त्व देतो.

माझ्या सार्वजनिक आयुष्यात अनेक नेते पाहिले; अनेकांना जवळून अनुभवले. पण, अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची नैतिक ताकद, तत्त्वांशी तडजोड न करण्याची वृत्ती आणि सामान्य माणसासाठी शेवटपर्यंत लढण्याची जिद्द ज्या व्यक्तिमत्त्वात मला सर्वाधिक प्रकर्षाने दिसली, ती म्हणजे शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते व सरचिटणीस भाई जयंत पाटील.

म्हणूनच माझ्यासाठी भाई म्हणजे केवळ एक राजकीय नेता नाहीत, तर नैतिक नेतृत्वाचा एक आदर्श आहेत. सत्ता असो वा नसो, अन्यायग्रस्तांच्या बाजूने ठामपणे उभे राहण्याचे धैर्य, प्रशासनासमोर निर्भीडपणे प्रश्न मांडण्याची क्षमता आणि न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने संघर्ष करण्याची ताकद भाई जयंत पाटील यांच्यामध्ये आजही तितक्याच सामर्थ्याने दिसते. म्हणूनच माझ्यासाठी 'भाई हे भाईच' आहेत.



# शेतकऱ्यांच्या संघर्षाचा आवाज जयंतभाई

**सत्ता नव्हे, सेवेलाच ध्येय मानणाऱ्या कर्तृत्ववान लोकनेत्याच्या कार्याला मानाचा मुजरा!**

सूर्य स्वतःसाठी कधी उगवत नाही, नदी स्वतःसाठी कधी वाहत नाही आणि वटवृक्ष स्वतःसाठी कधी सावली देत नाही. त्याचप्रमाणे स्वतःच्या सुख-दुःखाचा विचार न करता जनतेच्या अश्रूंना आधार, शेतकऱ्यांच्या संघर्षाला बळ आणि समाजाच्या आशांना नवी दिशा देणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे भाई जयंत पाटील. त्यांच्या कार्याचा प्रवास हा सत्तेचा नव्हे, तर सेवाभाव, संघर्ष आणि समर्पणाचा अखंड यज्ञ आहे. जनतेच्या विश्वासाच्या भक्कम पायावर उभे राहून त्यांनी लोकप्रतिनिधी या शब्दाला केवळ राजकीय ओळख न ठेवता सामाजिक जबाबदारीचे अधिष्ठान प्राप्त करून दिले आहे.

केवळ स्वर्गीय ना.ना. पाटील यांचे नातू किंवा प्रभाकर पाटील यांचे सुपुत्र म्हणून नव्हे, तर स्वतःच्या कर्तृत्वाच्या तेजाने महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक तसेच सहकाराच्या क्षितिजावर अढळ स्थान निर्माण करणारे नाव म्हणजे मा. आमदार भाई जयंत पाटील. शेतकरी, कष्टकरी, कामगार आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी आयुष्य झोकून देणारे, संघर्षाला कधीही न घाबरणारे आणि अन्यायाविरुद्ध सदैव खंबीरपणे उभे राहणारे नेतृत्व म्हणून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

महाभारतात द्रौपदीच्या अब्रूचे रक्षण करण्यासाठी श्रीकृष्ण धावून आले होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेच्या सन्मानासाठी स्वराज्य उभे केले. त्याच परंपरेतील विचार आपल्या कृतीतून जपणारा नेता म्हणजे जयंतभाई. महाराष्ट्रात शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्यांवर जेव्हा-जेव्हा अन्याय झाला, तेव्हा-तेव्हा जयंतभाई त्यांच्या पाठीशी सह्याद्रीसारखे खंबीर उभे राहिले.

आज विकासाच्या नावाखाली एमआयडीसी, एमएमआरडीए, नवे महामार्ग किंवा विविध प्रकल्पांच्या माध्यमातून हजारो शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित होत आहेत. विकासाला कुणाचाही विरोध नाही; पण शेतकऱ्यांच्या अस्तित्वावर घाला घालून होणारा विकास हा अन्यायच ठरतो. अशा प्रत्येक वेळी शेतकऱ्यांच्या व्यथा शासनापर्यंत पोहोचविण्याचे आणि त्यांच्या हक्कासाठी विधिमंडळापासून रस्त्यावरच्या आंदोलनापर्यंत संघर्ष करण्याचे काम भाई जयंत पाटील यांनी सातत्याने केले.

डोलवी एमआयडीसीच्या प्रश्नावर शेतकऱ्यांच्या लढ्याला दिशा देण्याचे मोठे कार्य त्यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयावरील मोर्चे असोत, प्रांत कार्यालयातील धरणे असोत किंवा गावागावातील बैठका; प्रत्येक ठिकाणी शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी जयंतभाई अग्रभागी दिसले. शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय एक इंचही जमीन संपादित होऊ नये, शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा, त्यांच्या मुलांच्या भविष्याची हमी मिळावी, यासाठी त्यांनी शासनाला कायदे करण्यास भाग पाडले.



**संतोष मंदा लक्ष्मण पाटील,**
**मा. नगरसेवक, पेण नगरपालिका**

जमीन विकलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांना भविष्यात आर्थिक सुरक्षितता मिळावी, त्यांच्या पुढील पिढीचे जीवनमान उंचवावे आणि विकासात मूळ भूमीपुत्रांचा सहभाग असावा, यासाठी त्यांनी सातत्याने भूमिका मांडली. केवळ विरोधासाठी विरोध न करता विकास आणि शेतकरी हित यामध्ये समतोल साधण्याचा त्यांचा प्रयत्न कायम राहिला आहे.

खारेपाटाच्या सिंचनाचा प्रश्न असो किंवा रायगडातील विविध विकासकामे- आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष कृतीवर विश्वास ठेवत त्यांनी शासनदरबारी सातत्याने पाठपुरावा केला. लोकांच्या प्रश्नांसाठी संघर्ष करताना त्यांना कधीही पद, प्रतिष्ठा किंवा सत्तेचा मोह झाला नाही. जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ नये, हीच त्यांची खरी ताकद ठरली. जयंतभाईंच्या नेतृत्वात संघर्ष आहे; पण संघर्षामध्ये संयम आहे. विरोध आहे; पण तो वैयक्तिक नसून तत्त्वांचा आहे. राजकारण आहे; पण त्यामागे समाजकारणाची ठाम भूमिका आहे. म्हणूनच शेतकरी, कामगार, युवक, महिला आणि सर्वसामान्य नागरिक आजही त्यांच्याकडे विश्वासाने पाहतात.

त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा व्यक्त करताना हा केवळ एका लोकप्रतिनिधीचा गौरव नाही, तर समाजासाठी आयुष्य वाहिलेल्या एका कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वाला दिलेला मानाचा मुजरा आहे. त्यांनी अशीच जनसेवेची वाट अखंड चालत राहावी; निरोगी, दीर्घायुषी राहून महाराष्ट्राच्या विकासात आणि शेतकऱ्यांच्या हक्काच्या लढ्यात नेतृत्व करत राहावे, हीच मनःपूर्वक प्रार्थना.

अर्पण

'सेवेसाठी तत्पर आहे, देवावर भक्ती आहे;
जीवनामध्ये शिस्त आहे, चारित्र्य शुद्ध आहे.
बुद्धीमध्ये विवेक आहे, हृदयामध्ये करुणा आहे;
मातृभूमीवर प्रेम आहे, मानवता हाच कुळधर्म आहे.'

कर्तृत्व हिमालयाएवढे, मन महासागराएवढे विशाल आणि जनसेवा हेच जीवनधर्म मानणाऱ्या आदरणीय जयंतभाई पाटील यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक, हार्दिक आणि मंगल शुभेच्छा!

# भाई म्हणजे सभागृहाचा विवेक...

राजकारणात पदे अनेकांना मिळतात; पण लोकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे, सभागृहाला विचारांची दिशा देणारे आणि सत्ताधाऱ्यांनाही सत्याची जाणीव करून देणारे नेते फार थोडे असतात. महाराष्ट्राच्या विधान परिषदेच्या इतिहासात भाई जयंत पाटील हे असेच एक व्यक्तिमत्त्व आहे. त्यांनी केवळ राजकारण केले नाही, तर लोकहिताचा ध्यास घेत लोकशाहीचा आत्मा जिवंत ठेवला.

सभागृहात त्यांच्या उपस्थितीने चर्चेची पातळी उंचावत असे. त्यांच्या आवाजात आक्रमकता होती; पण त्यामागे अभ्यास होता. त्यांच्या टीकेत धार होती; पण त्यामागे द्वेष नव्हता. त्यांच्या प्रत्येक शब्दामागे महाराष्ट्रातील शेतकरी, कामगार, कष्टकरी आणि सर्वसामान्य माणसाच्या वेदना दडलेल्या असत. म्हणूनच विरोधकही त्यांचा आदर करत आणि सत्ताधाऱ्यांनाही त्यांच्या प्रश्नांची गंभीर दखल घ्यावी लागत असे.

शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस म्हणून त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना केवळ विधानसभेच्या किंवा विधान परिषदेच्या चार भिंतींत मर्यादित ठेवले नाही, तर त्यांना शासनाच्या धोरणांपर्यंत पोहोचवले. शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत रस्ते पोहोचले पाहिजेत, ट्रॅक्टर आणि ट्रक थेट शेतात गेले पाहिजेत, शेतमालाचा वाहतूक खर्च कमी झाला पाहिजे, हा त्यांचा आग्रह होता. त्या विचाराचेच पुढे 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ता योजना' या स्वरूपात वास्तवात रूपांतर झाले. दूरदृष्टी असलेल्या नेतृत्वाचा हा जिवंत पुरावा आहे.

**ॲड. मंदार शिंगाडे पाटील**
**स्वीय सहाय्यक**

समाजातील स्त्रियांवरील अत्याचारांनी त्यांचे मन अस्वस्थ होत असे. निर्भया असो किंवा कोपर्डी, प्रत्येक घटनेने त्यांना वेदना दिल्या. ते म्हणत की, हा केवळ एका मुलीवरचा अत्याचार नाही; ही समाजाच्या विवेकावर झालेली जखम आहे. बलात्कार करणाऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी, कायद्यात बदल व्हावेत, महिलांना सुरक्षित वातावरण मिळावे, यासाठी त्यांनी सभागृहात सातत्याने भूमिका मांडली. समाजातील विकृतीला थांबविण्याचा त्यांचा हा प्रामाणिक प्रयत्न होता.

महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्याबद्दल त्यांना असलेला आदर हा केवळ भाषणापुरता नव्हता. नायगाव येथील सावित्रीबाई फुले यांच्या समाधी परिसराची दुरवस्था त्यांनी सभागृहात छायाचित्रांसह मांडली. शासनाला जाग आणली. त्यानंतर त्या स्मृतीस्थळाच्या विकासासाठी पावले उचलली गेली. इतिहासाला सन्मान देणारे नेतृत्वच भविष्य घडवू शकते, यावर त्यांचा विश्वास होता. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वांत मोठा गुण म्हणजे संकटात धावून जाण्याची वृत्ती. अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाच्या स्थळ पाहणीदरम्यान बोट अडचणीत आली तेव्हा स्वर्गीय विनायकराव मेटे यांनी मदतीसाठी भाईंना संपर्क केला. क्षणाचाही विलंब न करता त्यांनी मदत पोहोचवून अधिकारी आणि पत्रकारांच्या जीवितरक्षणासाठी हातभार लावला. ही घटना त्यांच्या माणुसकीची साक्ष देते. आज भाई जयंत पाटील विधान परिषदेत नाहीत; पण त्यांची उणीव प्रत्येक गंभीर चर्चेत जाणवते. भाई, आपण निरोगी राहा, दीर्घायुषी व्हा. आपल्या विचारांचा प्रकाश महाराष्ट्राच्या प्रत्येक पिढीला मार्गदर्शन करत राहो. शेतकरी, कामगार, कष्टकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी आपण असेच प्रेरणास्थान राहा.



**आपल्याला ७१ व्या वाढदिवसानिमित्त कोटी कोटी शुभेच्छा!**



# विधान परिषदेतील जयंतभाई



दिलीप जाधव, ज्येष्ठ पत्रकार, मंत्रालय आणि विधिमंडळ

सभापती महोदय... ''रोहा-अलिबाग रस्त्याच्या कामाची निविदा तात्काळ रद्द करण्याचे सरकारला निर्देश द्यावेत. यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे.'' असे सरकारला ठणकावून सांगणारे जयंतभाई किंवा ''रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांची महिना ५० कोटी रुपयांची कमाई'' असे महसूलमंत्री यांच्या तोंडावर सांगणारे जयंतभाई मी पाहिले आहेत. भाई एकदा संतापले की, ते कोणाची भीड-भाड ठेवत नाहीत. शेतकरी, शेतमजूर, कामगार वंचित-शोषित बांधवांचे प्रश्न कसे सोडवायचे, याकडे त्यांचे नेहमी लक्ष असायचे.

महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक जीवनात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांची ओळख केवळ राजकारणी म्हणून मर्यादित राहात नाही. त्यांचे विचार, कार्यपद्धती, लोकांशी असलेला संवाद आणि सार्वजनिक जीवनातील सातत्यपूर्ण योगदान यामुळे ते सर्वांच्या मनात वेगळे स्थान निर्माण करतात. शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार भाई जयंत प्रभाकर पाटील हे असेच एक व्यक्तिमत्त्व आहे. पत्रकार म्हणून माझा आणि जयंतभाई यांचा संबंध अनेक वर्षांचा आहे. विधान परिषद, मंत्रालय, विविध सार्वजनिक कार्यक्रम आणि राज्याच्या राजकीय घडामोडींच्या निमित्ताने त्यांना जवळून पाहण्याची संधी मला अनेकदा मिळाली. या काळात त्यांच्यातील अभ्यासू लोकप्रतिनिधी, संवेदनशील नेता आणि सुसंस्कृत माणूस अनुभवता आला. विधान परिषदेतील त्यांचे कामकाज पाहताना सर्वप्रथम जाणवणारी गोष्ट म्हणजे, विषयांचा सखोल अभ्यास. सभागृहात कोणत्याही विषयावर बोलताना त्यांची तयारी परिपूर्ण असायची. केवळ राजकीय टीका किंवा आरोप-प्रत्यारोप यावर त्यांचा भर नसे; तर प्रश्नांच्या मुळाशी जाऊन त्यावर विधायक उपाय सुचवण्याची त्यांची भूमिका असायची. त्यामुळे त्यांच्या भाषणांकडे सभागृहाचे विशेष लक्ष असायचे. रायगड जिल्हा, कोकण आणि ग्रामीण महाराष्ट्रातील प्रश्नांबद्दल त्यांना विशेष आस्था होती. शेतकरी, कष्टकरी, कामगार, सहकारी संस्था आणि ग्रामीण विकास यांच्याशी संबंधित विषय त्यांनी सातत्याने मांडले. राज्याच्या विकासात ग्रामीण भागाचा आवाज प्रभावीपणे पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी विधान परिषदेतील विविध आयुधांच्या माध्यमातून केले.

जयंतभाई यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, त्यांचा सर्वसमावेशक दृष्टिकोन. राजकीय मतभेद असले तरी वैयक्तिक संबंध जपण्याची त्यांची शैली अनेकांना भावते. पत्रकारांशी संवाद साधताना ते नेहमीच मनमोकळेपणाने बोलत. एखाद्या विषयाची पार्श्वभूमी समजावून सांगणे, वस्तुस्थिती मांडणे आणि पत्रकारांच्या प्रश्नांना संयमाने उत्तरे देणे, ही त्यांची कार्यशैली होती. जयंतभाई यांच्यासह माजी मंत्री स्व. मीनाक्षी ताई, माजी आ. बाळाराम पाटील, ज्येष्ठ आमदार गणपतराव देशमुख असे शेकापक्षाचे दिग्गज नेते विधिमंडळात असल्यामुळे शेकापक्षाचा एक वेगळाच दरारा होता. एका राजकीय प्रकरणात जयंतभाई यांची समजूत काढण्यासाठी मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख हे मेजेस्टिक आमदार निवास येथे आले होते.

भाईंनी समजूतदारपणा दाखवल्यामुळे विलासराव यांचे सरकार वाचले. विधिमंडळातील शेकापक्षाच्या कार्यालयात अधिवेशन काळात सर्वच पक्षाचे नेते, मंत्री, आमदार, पत्रकार अलिबागच्या प्रसिद्ध जिताडा म च्छीचा स्वाद घ्यायचे. जयंतभाई त्यांना आपुलकीने जेवणाचे आमंत्रण द्यायचे. अशा आमच्या जयंतभाई यांची आजही सर्वच मोठ्या आपुलकीने आठवण काढतात.विधान परिषदेच्या पत्रकार गॅलरीत बसून अनेकदा त्यांची भाषणे ऐकताना मला जाणवले की, लोकप्रतिनिधी म्हणून त्यांची प्राथमिकता नेहमी जनहिताचीच होती. सभागृहात बोलताना ते कोणत्याही विषयाकडे केवळ राजकीय चष्म्यातून पाहात नसत; तर त्याचा सामान्य माणसाच्या जीवनावर काय परिणाम होईल, याचा विचार करत असत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील साधेपणा आणि सहजता विशेष उल्लेखनीय आहे. मोठे पद, राजकीय प्रभाव आणि दीर्घ सार्वजनिक जीवन असूनही त्यांनी जमिनीशी असलेली नाळ कायम ठेवली. त्यामुळेच कार्यकर्ते, पत्रकार, अधिकारी आणि सर्वसामान्य नागरिक यांच्याशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले. आज मागे वळून पाहताना विधान परिषदेतील जयंतभाई यांचे योगदान केवळ संसदीय नोंदीपुरते मर्यादित राहिलेले नाही. त्यांनी लोकशाही संस्थांवरील विश्वास दृढ केला, लोकांच्या प्रश्नांना आवाज दिला आणि सभागृहाच्या प्रतिष्ठेला साजेसा आदर्श निर्माण केला.

एक पत्रकार म्हणून त्यांचे कामकाज जवळून पाहण्याची संधी मिळाली, ही माझ्यासाठी समृद्ध करणारी आणि संस्मरणीय बाब आहे. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात अभ्यासू, संयमी, विकासाभिमुख आणि लोकांशी नाळ जोडून ठेवणारे नेते म्हणून भाई जयंत प्रभाकर पाटील यांचे योगदान कायम स्मरणात राहील. विधान परिषदेतील त्यांचा प्रवास भावी लोकप्रतिनिधींसाठी प्रेरणादायी आहे, यात शंका नाही. जयंतभाई यांच्या ७१व्या वाढदिवसानिमित्त त्यांना उदंड आयुष्य आणि ठणठणीत आरोग्य प्राप्त होवो, हीच माझी माता जगदंबेकडे प्रार्थना आहे.





# भाई म्हणजे विश्वास!

काशिनाथ पाटील, माजी सभापती, पनवेल पंचायत समिती

**शेतकरी कामगार पक्षाचे आदरणीय नेते भाई जयंत पाटील यांचा वाढदिवस ७ जुलै रोजी साजरा होत आहे. त्यानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त करतो. भाईंना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो आणि त्यांचे नेतृत्व समाजाला तसेच पक्षाला असेच प्रेरणादायी ठरो, हीच सदिच्छा.**

**भाई जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी कामगार पक्ष नव्या जोमाने आणि नव्या उमेदीने पुढे वाटचाल करत आहे. बदलत्या राजकीय परिस्थितीत पक्षाची वैचारिक भूमिका अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि संघटना अधिक बळकट करण्यासाठी त्यांनी नव्याने चळवळ सुरू केली आहे. कार्यकर्त्यांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण काम त्यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे.**

**अलीकडेच पार पडलेल्या पक्षाच्या मध्यवर्ती समितीच्या आणि जिल्हा चिटणीस मंडळाच्या बैठकीत पक्षाला नवसंजीवनी देण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध उपाययोजनांवर सखोल चर्चा झाली. संघटनात्मक बांधणी, नव्या कार्यकर्त्यांना संधी, युवकांचा सहभाग आणि पक्षाचा विचार अधिक व्यापकपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या. या बैठकीमुळे राज्यभरातील कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. भाईंच्या नेतृत्वावर कार्यकर्त्यांचा अढळ विश्वास आहे. शेतकरी कामगार पक्ष पुन्हा नव्या ताकदीने उभारी घेईल आणि आगामी काळात भाई जयंत पाटील यांचे प्रभावी नेतृत्व पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या विधिमंडळात पाहायला मिळेल, याबाबत मला पूर्ण विश्वास आहे.**

**भाईंच्या नेतृत्वाखाली शेकापची वैचारिक परंपरा अधिक मजबूत होईल, संघटना अधिक सक्षम बनेल आणि शेतकरी, कामगार, कष्टकरी व सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी पक्ष पुन्हा पूर्वीप्रमाणे आघाडीवर राहील, अशी खात्री आहे.**

**भाई जयंत पाटील यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांच्या नेतृत्वात शेतकरी कामगार पक्ष पुन्हा नव्या उमेदीने भरारी घेवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.**

## कृषकांचा हुंकार, श्रमिकांचा एल्गार...

# जनसामान्यांचा आधार

शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस भाई जयंत पाटील यांचा आज ७१ वा अभिष्टचिंतन सोहळा साजरा होत आहे. त्यांना निरोगी आणि निरामय आरोग्याच्या शुभेच्छा देताना आम्हा कार्यकर्त्यांची एकच मागणी आहे; 'भाई आपण विधान परिषदेच्या पटलावर पुन्हा एकदा पाय रोवून उभे राहा'. महाराष्ट्रातील तमाम अन्यायग्रस्त, पीडित, शोषित, वंचित, शेतकरी आणि कामगारांना आपण विधिमंडळात असण्याची नितांत गरज आहे.

शेतकरी कामगार पक्षाची परंपरा ही संघर्ष, स्वाभिमान आणि तत्त्वनिष्ठ राजकारणाची आहे. या परंपरेचे आजचे सक्षम प्रतिनिधित्व म्हणजे भाई जयंत पाटील आहेत. भाईंचा स्पष्टवक्तेपणा, अभ्यासू वृत्ती, सभागृहातील प्रभावी मांडणी, सत्येला निर्भीडपणे प्रश्न विचारण्याचे धैर्य आणि जनतेच्या प्रश्नाबाबतची संवेदनशीलता यामुळे राजकारणात त्यांनी स्वतः ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. भाईंनी आजवर अनेक प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधले. मात्र, कधीही श्रेयवादाच्या राजकारणात भाई अडकले नाहीत. विकासाला प्राधान्य आणि जनहिताला सर्वोच्च स्थान हीच त्यांच्या सार्वजनिक जीवनाची खरी ओळख राहिली आहे.



**ॲड. मानसी संतोष म्हात्रे,
उपनगराध्यक्षा तथा आरोग्य सभापती, अलिबाग नगरपरिषद
तथा महिला आघाडी प्रमुख,
राज्य मध्यवर्ती समिती.**

आज भाई जयंत पाटील यांच्या सार्वजनिक जीवनाकडे मागे वळून पाहिले तर त्यात केवळ भाषणे किंवा राजकीय भूमिका दिसत नाही, तर शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्याची धडपड, कारागिरांच्या हाताला काम मिळवून देण्याचा संघर्ष, रुग्णांचे जीव वाचविण्याचा प्रयत्न, खेळाडूंच्या भविष्याची काळजी आणि सामान्यांच्या प्रश्नांसाठी लढणारा एक अभ्यासू लोकप्रतिनिधी दिसतो.

सध्याच्या बदलत्या राजकारणात सर्वसामान्य जनतेचे प्रश्न शासन दरबारी मांडण्याकरिता आज भाई विधानपरिषदेमध्ये असणे काळाची गरज आहे. भाईंची गेली २४ वर्षांहून अधिक काळ असलेली सभागृहातील भूमिका ही केवळ विरोधासाठी विरोध करणारी नव्हती, तर विधायक सूचना, ठोस अभ्यास, तर्कशुद्ध मांडणी आणि जनहिताची जाणीव यांवर आधारलेली होती. ग्रामीण भागातील आरोग्य सेवा, शेतकरी, सहकार, रोजगार, सांस्कृतिक वारसा, महिला सन्मान, क्रीडा, पोलीस कर्मचारी, जलसंपदा आणि कोकणाच्या विकासाशी निगडीत अनेक प्रश्न त्यांनी सातत्याने विधान परिषदेत मांडले. त्यांच्या पाठपुराव्यामुळे अनेक निर्णय शासनाला घ्यावे लागले. भाईंनी सभागृहात मांडलेल्या प्रभावी भूमिकेतून केवळ रायगड जिल्ह्याच नव्हे तर, महाराष्ट्रातील अनेक संयुक्त घटकांना कायमस्वरूपी न्याय मिळाला.

महाराष्ट्रातील शेतकरी कर्जबाजारीपणामुळे मोठ्या संकटात सापडला होता. या प्रश्नावर भाई जयंत पाटील यांनी विधान परिषदेत सातत्याने सरकारला धारेवर धरले. शेतकऱ्यांना तातडीची कर्जमाफी मिळावी, ७/१२ कोरे व्हावेत आणि शेतकऱ्यांना नव्याने उभे राहण्याची संधी मिळावी, यासाठी त्यांनी प्रभावी मांडणी केली. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना चर्चेत आली. या योजनेद्वारे लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. या प्रक्रियेत सभागृहात सातत्याने दबाव निर्माण करणाऱ्या प्रमुख आवाजांमध्ये भाई जयंत पाटील यांचा उल्लेख महत्त्वाचा ठरतो. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी सातत्यपूर्ण लढा देणारे हे भाईच...

भाई जयंत पाटील यांची राजकीय वाटचाल ही केवळ सभागृहापुरती मर्यादित राहिलेली नाही. सहकार क्षेत्र हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे, या भूमिकेतून त्यांनी सातत्याने स्थानिक युवकांना न्याय मिळावा, यासाठी संघर्ष केला. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि सहकारी संस्थांमध्ये स्थानिक भूमीपुत्रांना प्राधान्य मिळावे, या मागणीसाठी त्यांनी विधान परिषदेत अभ्यासपूर्ण चर्चा केली.

रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील हमरापूर हे गणेशमूर्ती निर्मितीचे महत्त्वाचे केंद्र आहे. हजारो कारागिरांचे संसार या उद्योगावर अवलंबून आहेत. पीओपी मूर्तींवरील निर्बंधांमुळे हा पारंपरिक उद्योग मोठ्या संकटात सापडला होता, तेव्हा अनेक स्थानिक कारागिरांनी भाई जयंत पाटील यांची भेट घेतली. त्यांनी केवळ भावना व्यक्त केल्या नाहीत, तर या विषयाचा वैज्ञानिक अभ्यास करण्याचा मार्ग स्वीकारला. पुण्यातील नॅशनल केमिकल लॅबोरेटरीमधील शास्त्रज्ञ जयंत गाडगीळ, शुभांगी उंबरकर, डॉ. प्रमोद मोघे आणि त्यांच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून त्यांनी पीओपीच्या वापराबाबत वैज्ञानिक माहिती गोळा केली. विधान परिषदेत त्यांनी हा विषय अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडला. विसर्जनानंतर मूर्ती संकलित करून त्यांचे पुनर्प्रक्रिया (रियासकलिंग) करता येते, पीओपीचा पुनर्वापर शक्य आहे, तसेच प्रत्येक महानगरपालिका, नगरपालिका आणि ग्रामपंचायतीने योग्य विसर्जन व्यवस्था उभारावी, अशी विधायक भूमिका त्यांनी मांडली आणि अखेर मूर्तीकारांना न्याय मिळाला.

आजही हमरापूर गावातील कारागिरांच्या हाताला काम आहे. तेथील गणेशमूर्ती महाराष्ट्रपुरत्याच मर्यादित नसून, देश-विदेशात पोहोचत आहेत. परंपरा, पर्यावरण आणि रोजगार यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न म्हणजे भाई जयंत पाटील यांची या विषयातील भूमिका होय. हमरापूरच्या गणेशमूर्ती उद्योगाला आधार देणारे भाईच....

ग्रामीण भागातील एखादा गंभीर रुग्ण वेळेवर उपचाराअभावी जीव गमावतो, ही बाब भाई जयंत पाटील यांना सतत अस्वस्थ करत होती. तालुका, ग्रामीण, उपजिल्हा आणि जिल्हा रुग्णालयापर्यंत तातडीची रुग्णवाहिका सेवा पोहोचली पाहिजे, यासाठी त्यांनी सातत्याने विधान परिषदेत आवाज उठवला. त्यांच्या आग्रही भूमिकेमुळे शासनाने १०८ आपत्कालीन रुग्णवाहिका सेवेचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला. कोकणाचा लांबलचक समुद्रकिनारा, खाड्या आणि बेटांवरील गावे यामुळे गंभीर रुग्णांना मुंबई किंवा मोठ्या शहरात पोहोचविणे अनेकदा कठीण ठरते, ही समस्या लक्षात घेऊन भाई जयंत पाटील यांनी विधान परिषदेत वॉटर ॲम्ब्युलन्सची अभिनव संकल्पना मांडली. उरण, पनवेल, अलिबाग, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रुग्णांना जलमार्गाने तातडीने मुंबईतील अत्याधुनिक रुग्णालयांमध्ये पोहोचविण्याचा हा दूरदृष्टीपूर्ण विचार होता, शासनाने या प्रस्तावाची दखल घेतली असून, भविष्यात हा पायलट प्रकल्प प्रत्यक्षात आल्यास कोकणातील आरोग्य व्यवस्थेत ऐतिहासिक बदल घडवू शकतो. कोकणासाठी वॉटर ॲम्ब्युलन्सची दूरदृष्टी ठेवणारे भाईच...

सन २००९ च्या अधिवेशनातील एक प्रसंग आजही स्मरणात राहणारा आहे. विधान भवनाच्या लॉबीत शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते स्वर्गीय गणपतराव देशमुख, मीनाक्षीताई पाटील, विवेक पाटील आणि विधानपरिषदेतील भाई जयंत पाटील उपस्थित होते.

त्या काळात उरण आणि पनवेलच्या वाढत्या महत्त्वाचा विचार करून मुंबईशी थेट सागरी संपर्क असणे अत्यावश्यक असल्याचे भाई जयंत पाटील यांनी तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्यासमोर प्रभावीपणे मांडले. त्यानंतर बैठक झाली आणि एमएमआरडीसीएमार्फत तांत्रिक आराखडा तयार करण्याचा निर्णय घेतला.

आज साकार होत असलेला मुंबई-पनवेल-उरण सागरी सेतू हा केवळ पायाभूत सुविधा प्रकल्प नसून, त्या काही दूरदृष्टीने मांडलेल्या विचारांचा परिणाम आहे. विशेष म्हणजे, या काम चे श्रेय घेण्यापेक्षा विकास महत्त्वाचा, हीच भाईंची कायम भूमिका राहिलेली आहे. मुंबई-पनवेल-उरण सागरी सेतूची दूरदृष्टी भाईंचीच....

समाजसुधारक सावित्रीबाई फुले या भारतातील स्त्रीशिक्षणाच्या इतिहासातील तेजस्वी व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांच्या नायगाव येथील समाधीस्थळाची झालेली दुरवस्था भाई जयंत पाटील यांनी विधान परिषदेत अत्यंत संवेदनशीलतेने मांडली.

पेण तालुक्यातील हेटवणे मध्यम प्रकल्प हा हजारो शेतकऱ्यांच्या भवितव्याशी निगडित विषय होता. प्रशासकीय मंजुरी, भूसंपादनाचा मोबदला आणि प्रकल्पाच्या रखडलेल्या कामांमुळे शेतकरी अडचणीत होते. भाई जयंत पाटील यांनी हा विषय वारंवार विधान परिषदेत मांडला. प्रकल्पाला चतुर्थ प्रशासकीय मान्यता मिळावी, भूसंपादित शेतकऱ्यांना न्याय मोबदला मिळावा आणि सिंचनासाठी पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी त्यांनी शासनावर सातत्याने दबाव आणला. या प्रयत्नांमुळे सुमारे ७७६ कोटी रुपयांच्या प्रशासकीय मान्यतेचा मार्ग मोकळा झाला. या निर्णयामुळे प्रकल्पाच्या कामाला गती मिळाली आणि परिसरातील शेतीच्या विकासाला नवी दिशा मिळाली. हेटवणे मध्यम प्रकल्पासाठी सातत्यपूर्ण लढा देणारे भाईच....

राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था सक्षम राहण्यासाठी पोलीस दल सशक्त असणे आवश्यक आहे. मात्र, अनेक वर्षे रिक्त पदे, अपुरी मनुष्यबळ व्यवस्था आणि निवासस्थानांच्या समस्या गंभीर स्वरूपात होत्या. भाई जयंत पाटील यांनी विधान परिषदेत या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधले. रिक्त पदे तातडीने भरावीत, पोलीस कर्मचाऱ्यांना दर्जेदार व परवडणारी घरे उपलब्ध करून द्यावीत, विशेषतः मुंबईसारख्या शहरात सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना सन्मानाने राहता यावे, अशी त्यांची सातत्यपूर्ण मागणी होती. पोलीस दलाच्या प्रश्नांसाठीचा प्रभावी आवाज म्हणजे भाईच...

रायगड हा कबड्डीचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. ग्रामीण भागातील अनेक खेळाडूंनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवले; परंतु त्यांच्या भविष्याची चिंता कायम होती. भाई जयंत पाटील यांनी गुणवंत खेळाडूंना शासकीय सेवेत संधी मिळावी, यासाठी विधान परिषदेत सातत्याने मागणी केली. त्यामुळे ग्रामीण भागातील अनेक युवकांना क्रीडा क्षेत्रात त्यांचे भविष्य घडविण्याकरिता प्रोत्साहन मिळाले. कबड्डी आणि ग्रामीण खेळ प्रकारांना प्रोत्साहन देणारे भाईच...

भाईंनी दोन दशकांहून अधिक काळ विधान परिषदेच्या माध्यमातून एक ना अनेक प्रश्नांवर आवाज उठवून शासनाला जनसामान्यांच्या हिताचे निर्णय घेण्यास भाग पाडले आहे. बदलत्या परिस्थितीत आज सर्वसामान्य जनता त्रस्त झालेली आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव नाही, शेतकरी अधिकाधिक कर्जबाजारी होत आहेत, जीवनावश्यक वस्तुंचे भाव गगनाला भिडलेले आहेत, कारखानदारी बंद होत चाललेली आहे, बेरोजगार तरूण रस्त्यावर उभे आहेत, हातांना काम नाही, शासन दरबारी नोकर भरती नाही, स्पर्धा परीक्षा आणि प्रवेश परीक्षांचे पेपरफुटीचे अनेक घोटाळे बाहेर पडत आहेत, शिक्षण क्षेत्र महागलेले आहे. भोंदूबाबांनी हा महाराष्ट्र पोखरला आहे, अंधश्रध्देपायी स्त्रिया बळी जात आहेत, महिला सुरक्षा धोक्यात आली आहे, लोकशाहीचा कोणताच मार्ग सर्वसामान्य जनतेच्या हिताचा राहिलेला नाही. राजकारणाची पातळी पूर्णपणे घसरलेली आहे. अशा परिस्थितीत जनतेच्या हिताचे प्रश्न मांडण्याकरिता, सरकारला जाब विचारण्याकरिता आणि समाजाला न्याय देण्याकरिता भाई विधिमंडळात हवे आहेत. भाईंचे कार्य हे एका पक्षापुरते मर्यादित न राहता जनहिताच्या व्यापक ध्येयाशी जोडलेले आहे, म्हणूनच जनतेच्या प्रश्नांचा हा बुलंद आवाज असाच प्रभावीपणे घुमत राहो आणि महाराष्ट्राच्या विकासासाठी त्यांचे योगदान भविष्यातही प्रेरणादायी ठरो. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त करताना, निरोगी आयुष्य, उत्तम स्वास्थ्य आणि समाजसेवेची अखंड ऊर्जा लाभो. शेतकरी कामगार पक्षाच्या महाराष्ट्रातील तमाम महिला कार्यकर्त्यांचा भाईना आजच्या वाढदिवसाच्या मंगल अभीष्टचिंतन सोहळ्याच्या दिनी मानाचा लाल सलाम.... लाल सलाम... लाल सलाम....